महाविद्यालयामध्ये असणारे अत्यंत सुसज्ज व अत्याधुनिक संगणक प्रणालींनी समृद्ध ग्रंथालय, स्मार्ट क्लासरूम्स, अत्याधुनिक प्रयोगशाळा, विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणारे विविध प्रकल्प, अनेक तज्ज्ञ मान्यवरांची व्याख्याने, वर्कशॉप्स, सेमीनार, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय परिषदा, अत्यंत प्रभावी व सक्षम प्रशासन, जवळपास ३० हून अधिक खेळांमध्ये प्रावीण्य सिद्ध केलेले सुसज्ज क्रीडांगण, भव्य क्रोमा स्टुडिओ व संगणक विभागाच्या दर्जेदार प्रयोगशाळा व अन्य शैक्षणिक सुविधा, अत्यंत अनुभवी व व्यासंगी प्राध्यापक वर्ग या महाविद्यालयाच्या वैशिष्ट्यांसह आज महाविद्यालय शैक्षणिक क्षेत्रात नव्या महत्त्वाकांक्षी उपक्रमांकडे वाटचाल करीत आहे. त्यासाठी यूजीसी व रुसा, नवी दिल्ली यांचे भरघोस अर्थसाहाय्य प्राप्त झाल्याची माहिती प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी दिली.

# टी. सी. महाविद्यालयात स्वायत्ततेचे पर्व सुरू

## सचिव जवाहर शाह वाघोलीकर यांची माहिती; विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान देण्यावर भर

**बारामती : प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि महाराष्ट्र राज्यात आपल्या वैविध्यपूर्ण गुणवत्तेने महत्त्वाचे स्थान निर्माण करणाऱ्या तुळजाराम चतुरचंद (टी.सी.) महाविद्यालयाने शैक्षणिक गुणवत्तेमध्ये स्वायत्तता मिळवून एक पाऊल पुढे टाकले आहे. विद्यापीठाचा 'उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार', डीएसटी, डीबीटी, सीपीई, नॅक रि-ॲक्रीडीटेंशन 'ए' दर्जा अशी अनेक मानांकने मिळविणाऱ्या या महाविद्यालयाने आता शैक्षणिक स्वायत्तता मिळवून भारतातील नामांकित महाविद्यालयांमध्ये समाविष्ट होण्याचा मान पटकावला असल्याची माहिती संस्थेचे सचिव जवाहर शाह (वाघोलीकर) यांनी शनिवारी (दि. १) पत्रकार परिषदेमध्ये दिली. यावेळी प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर, कार्यालयीन अधीक्षक अभिनंदन शहा, विकास शहा लेंगरेकर उपस्थित होते.

या शैक्षणिक स्वायत्ततेमुळे महाविद्यालयात सुरू असणाऱ्या पदवी स्तरावरील २५ व पदव्युत्तर स्तरावरील १८ अभ्यासक्रमांमध्ये आता कालसुसंगत, राष्ट्रीय शैक्षणिक दर्जा व गुणवत्तेस अग्रक्रम देणाऱ्या कालानुरूप व्यावसायिक अभ्यासक्रमांची रचना करण्यात आली आहे. याच्या जोडीला विद्यार्थ्यांना विविध व्यावहारिक कौशल्ये प्राप्त व्हावीत म्हणून ७० हुन अधिक लघू आणि दीर्घ कौशल्याधिष्ठित सर्टिफिकेट कोर्सेसदेखील निर्माण केले गेले असल्याची माहिती शहा यांनी दिली. शैक्षणिक बदलांमधील सर्वात महत्वाचा बदल म्हणजे महाविद्यालयाने सुरु केलेली ही ७० हुन अधिक विविध कौशल्यावर आधारित सर्टिफिकेट कोर्सेसची योजना, या कोर्से सद्वारे विद्यार्थी कोणत्याही ज्ञान शाखेतील कौशल्ये आत्मसात करू शकेल व निश्चितपणे आजच्या तंत्र ज्ञानयुगात उपलब्ध असणाऱ्या अनेक संधी त्यास सहजपणे उपलब्ध होतील. तज्ज्ञ प्राध्यापक वर्ग, आधुनिक साहित्याने सुसज्ज अशा प्रयोगशाळा, वर्षभर राबविण्यात येणारे विविध विद्यार्थीभिमुख आणि समाजोपयोगी असे उपक्रम आणि प्रत्येक स्तरावर देण्यात येणारे शैक्षणिक स्वातंत्र्य यामुळे व यासोबत केल्या गेलेल्या नाविन्यपूर्ण बदलांमुळे निश्चितच विद्यार्थ्यांचा आणि महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा अधिक उंचावण्यास होणार मदत आहे.

जानेवारी महिन्यात संस्थेला हा दर्जा प्राप्त झाला होता. यामध्ये स्वतःचा अभ्यासक्रम, त्यामध्ये बदल, तसेच विविध कोर्सेस सुरु करण्यास परवानगी देण्यात आली होती. या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना या विषयावर मार्गदर्शन करण्यात येणार असून कौशल्य विकासावर भर देण्यात येणार आहे. राष्ट्रीय सेवा, विद्यार्थ्यांची क्षमता वाढविण्यासाठी संस्थेच्या वतीने सातत्याने प्रयत्न करण्यात येत असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरुमकर यांनी दिली.

विद्यार्थ्यांना संशोधन क्षेत्रात काम करण्यात वाव देण्यात येणार आहे. स्वायत्ततेचा परीपूर्ण फायदा घेण्यासाठी ऊर्जा, पर्यावरण, आरोग्य यावर अभ्यासगट तयार करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे सर्व परीक्षांचे निकाल एकाच महिन्यात लावण्यासाठी महाविद्यालय तयार असल्याची माहितीं मुरुमकर यांनी दिली. अशा प्रकारचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना आर्थिक साहाय्यही करण्यात येणार आहे. यासाठी विद्यार्थ्यांना कायम महाविद्यालयात थांबून प्रशिक्षण घेण्याची गरज आहे.

दरम्यान राज्यातील २२ महाविद्यालयांना स्वायत्तता दर्जा मिळाला असून यामध्ये बारामतीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय आणि पंढरपूर येथील महाविद्यालयाचा समावेश आहे.

### नव्या महत्त्वाकांक्षी उपक्रमांकडे वाटचाल

महाविद्यालयामध्ये असणारे अत्यंत सुसज्ज व अत्याधुनिक संगणक प्रणालींनी समृद्ध ग्रंथालय, स्मार्ट क्लासरूम्स, अत्याधुनिक प्रयोगशाळा, विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणारे विविध प्रकल्प, अनेक तज्ज्ञ मान्यवरांची व्याख्याने, वर्कशॉप्स, सेमीनार, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय परिषदा, अत्यंत प्रभावी व सक्षम प्रशासन, जवळपास ३० हून अधिक खेळांमध्ये प्रावीण्य सिद्ध केलेले सुसज्ज क्रीडांगण, भव्य क्रोमा स्टुडिओ व संगणक विभागाच्या दर्जेदार प्रयोगशाळा व अन्य शैक्षणिक सुविधा, अत्यंत अनुभवी व व्यासंगी प्राध्यापक वर्ग या महाविद्यालयाच्या वैशिष्ट्यांसह आज महाविद्यालय शैक्षणिक क्षेत्रात नव्या महत्त्वाकांक्षी उपक्रमांकडे वाटचाल करीत आहे. त्यासाठी यूजीसी व रुसा, नवी दिल्ली यांचे भरघोस अर्थसाहाय्य प्राप्त झाल्याची माहिती प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी दिली.

...am Chatur... Baramati

Tuljaram Chaturchand College ★ Library ★ Baramati

प्रभात पुणे, रविवार, दि. २ जून २०१९ ७

# टी. सी. कॉलेजचे स्वायत्ततेचे पर्व सुरू

## नामांकित महाविद्यालयांमध्ये समाविष्टचा मान : संस्थेचे सचिव जवाहर शाह-वाघोलीकर यांची माहिती

**बारामती, दि. १ (प्रतिनिधी)** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि महाराष्ट्र राज्यात आपल्या वैविध्यपूर्ण गुणवत्तेने महत्त्वाचे स्थान निर्माण करणाऱ्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाने शैक्षणिक गुणवत्तेमध्ये स्वायत्तता मिळवून एक पाऊल पुढे टाकले आहे. विद्यापीठाचा 'उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार', डीएसटी, डीबीटी, सीपीई, नॅक रि-ॲक्रीडीटेंशन 'अ+' दर्जा अशी अनेक मानांकने मिळविणाऱ्या या महाविद्यालयाने आता शैक्षणिक स्वायत्तता मिळवून भारतातील नामांकित महाविद्यालयांमध्ये समाविष्ट होण्याचा मान पटकावला आहे, अशी माहिती संस्थेचे सचिव जवाहर शाह-वाघोलीकर यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली.




या शैक्षणिक स्वायत्ततेमुळे महाविद्यालयात सुरू असणाऱ्या पदवी स्तरावरील २५ व पदव्युत्तर स्तरावरील १८ अभ्यासक्रमांमध्ये आता कालसुसंगत, राष्ट्रीय शैक्षणिक दर्जा व गुणवत्तेस अग्रक्रम देणाऱ्या कालानुरूप व्यावसायिक अभ्यासक्रमांची रचना करण्यात आली आहे.

याच्या जोडीला विद्यार्थ्यांना विविध व्यावहारिक कौशल्ये प्राप्त व्हावीत म्हणून ७० पेक्षा अधिक लघू आणि दीर्घ कौशल्याधिष्ठित सर्टिफिकेट कोर्सेस देखील निर्माण केले गेले आहेत. या कोर्सेसद्वारे विद्यार्थी कोणत्याही ज्ञान शाखेतील कौशल्ये आत्मसात करू शकेल व निश्चितपणे आजच्या तंत्र ज्ञानयुगात उपलब्ध असणाऱ्या अनेक संधी त्यास सहजपणे उपलब्ध होतील.

शैक्षणिक स्वायत्ततेसोबत महाविद्यालयाने सुरु केलेले क्रेडीट सिस्टीमद्वारे मूल्यांकन परीक्षा पद्धती आणि सेमिस्टर सिस्टीमप्रमाणे योजलेली अभ्यासक्रम रचना या नाविन्यपूर्ण शिक्षण प्रणालीमुळे विद्यार्थी त्यांच्याकडील उपलब्ध वेळेत अधिकाधिक व्यावसायिक कौशल्ये प्राप्त करू शकतील. सोबत महाविद्यालयामध्ये अनेकविध प्रयोगदर्शी उपक्रम, रिसर्च प्रोजेक्ट्स, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील विविध क्षेत्रातील संशोधन यावर देखील भर देण्यात येत असून महाविद्यालयातील 'सेंटर फॉर इनोव्हेटिव्ह ॲण्ड ॲप्लाइड रिसर्च' या संशोधन शाखेमार्फत विविध क्षेत्रात प्रत्यक्ष संशोधन करण्याची संधी देखील विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

### 'एम्प्लॉयबिलिटी ॲण्ड करिअर हब'

रोजगार निर्मिती व व्यवसायाभिमुख पारंगतता प्राप्त करून देणारा 'एम्प्लॉयबिलिटी ॲण्ड करिअर हब' देखील स्थापन केला आहे. देशभरातील विविध उद्योग क्षेत्रे , विविध मान्यवर शैक्षणिक व संशोधन संस्था व अनेक राष्ट्रीय प्रकल्प यांच्याशी करण्यात येत असलेल्या सामंजस्य करारांमुळे येथून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यास समाजात आज उपलब्ध होणाऱ्या नोकरीच्या विविध संधी सहज प्राप्त होतील आणि विद्यार्थी आपल्या कौशल्याने व आत्मविश्वासाने आजच्या वेगवान समाजामध्ये भक्कमपणे नोकरी किंवा स्वतःचा व्यवसाय सुरू करून यशस्वी होऊ शकेल.

सकाळ · दि - २|६|१९ - पा.नं - २

# टीसी महाविद्यालय रोजगाराभिमुख शिक्षणप्रणालीच्या दिशेने...

» पान १ वरून

ज्ञानापेक्षा प्रॅक्टिकल नॉलेजवर अधिक भर देणे, असे हे बदल आहेत. यात क्रेडिट पॉइंट प्रणाली लागू होणार असल्याने केवळ गुणात्मक नाही; तर दर्जात्मक सुधारणेची अधिक गरज मुलांना भासेल.

**स्कील्ड एज्युकेटेड यूथ**

सर्वांगाने परिपूर्ण विद्यार्थी घडविण्यावर या अभ्यासक्रमात भर दिला आहे. पुस्तकी ज्ञानासोबतच विद्यार्थ्याला काहीतरी व्यावसायिक कौशल्य प्राप्त होईल, संभाषण कौशल्यासह जगाची माहिती कशी मिळेल, याचा यात प्रयत्न आहे. समूहचर्चा, भाषण, चर्चेतून सहभाग, प्रकल्पांवर काम करणे, इतर कार्यक्रमांतून सहभाग नोंदविणे, अशा अनेक मुद्यांचा यात समावेश आहे.

**करवून घेण्यावर भर**

शिक्षकांनी शिकवायचे आणि मुलांनी शिकायचे, ही पद्धत दूर सारून मुलांकडून सर्व गोष्टी करवून घेण्यावर नव्या प्रणालीत भर आहे. एखादा विषय देऊन त्याचा प्रकल्प, समूहचर्चा, बाहेरच्या जगात जाऊन माहिती गोळा करणे, अशा अनेक बाबींचा नवीन पद्धतीत समावेश करण्यात आला आहे. परीक्षांचे निकाल महाविद्यालय तिसाव्या दिवशी जाहीर करेल, तर प्रत्येक विद्यार्थ्याचे दर पंधरा दिवसांनी मूल्यमापन केले जाईल.

**स्टायपेंडची संकल्पना**

महाविद्यालय स्तरावर कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना काही प्रमाणात मानधन देऊ करण्याची योजनाही ग्रामीण भागात या निमित्ताने प्रथमच सुरू होणार आहे. अभ्यासक्रमात कमालीची लवचिकता ठेवण्यात आली असून, गरज व काळानुरूप ती कधीही बदलता येईल, अशी सुविधा देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयातील प्राध्यापकांकडून विविध विषयांवरील लेक्चर्स शूट करून ठेवण्याचे काम सुरू आहे. मुलांना चोवीस तास कधीही याबाबतची माहिती यू ट्यूबवरून घेता येईल.

पुढारी · दि - २|६|२०१९ · पा.नं - ६

# श्रेया गांधीला गणितात १०० गुण



**बारामती :** बारावीच्या परीक्षेत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील विद्यार्थिनी श्रेया गांधी हिने ९३.८५ टक्के गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविला. तसेच, गणित विषयांत तिने १०० पैकी १०० गुण मिळवून विशेष यश संपादन केले. अभ्यासातील सातत्य, शिक्षकांशी विविध घटकांवर चर्चा व सतत अभ्यास करीत महाविद्यालयातील शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे तिला हे यश मिळाले आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी पुढील परीक्षा तिने दिलेल्या आहेत. त्यातही तिला नाटामध्ये १६१ गुण जेईईमध्ये ९८ गुण प्राप्त झाले आहेत. यामध्येही महाविद्यालयातील शिक्षकांचे बहुमोल मार्गदर्शन तिला लाभले. या यशाबद्दल संस्थेचे सचिव जवाहर वाघोलीकर, सर्व संस्थाचालक, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, सर्व उपप्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, रजिस्ट्रार अभिनंदन शहा यांनी तिचे अभिनंदन केले आहे. पुढारी 2/6/19 पान 6

Tuljaram Chaturchand College
Library
Baramati

मा. प्राचार्य साहेब

सकाळ पुणे, रविवार, २ जून २०१९

# टीसी महाविद्यालय रोजगाराभिमुख शिक्षणप्रणालीच्या दिशेने




बारामती : तुळजाराम चतुरचंद (टीसी) महाविद्यालयाचे प्रवेशद्वार.

**पारंपरिक शिक्षणाची पद्धत दूर सारत रोजगाराभिमुख आणि व्यक्तिमत्त्व विकसित करणारे शिक्षण देण्याचा श्रीगणेशा बारामतीतील तुळजाराम चतुरचंद (टीसी) महाविद्यालयाकडून यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून सुरू होत आहे. राज्यात स्वायत्तताप्राप्त ग्रामीण भागातील अवघ्या दोन महाविद्यालयांत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय आता ज्ञानरचनावादावर आधारित अभ्यासक्रम सुरू करणार आहे.**

**मिलिंद संगई**, बारामती

'नॅक'मध्ये 'ए प्लस प्लस' ही श्रेणी प्राप्त केलेल्या बारामतीच्या टीसी महाविद्यालयाला स्वायत्तता मिळाल्यानंतर आता कला, विज्ञान व वाणिज्य शाखेचा बारावीनंतरच्या प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमात तीस टक्क्यांहून अधिक बदल करण्याचा निर्णय महाविद्यालयाने घेतला.

## » प्रासंगिक

संस्थेचे अध्यक्ष अरहतदास सराफ, सचिव जवाहर वाघोलीकर, विश्वस्त मिलिंद वाघोलीकर, विकास लेंगरेकर, प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, उपप्राचार्य डॉ. शिवाजी साठे, डॉ. अविनाश जगताप, डॉ. सचिन गाडेकर, डॉ. अजित तेळवे, रजिस्ट्रार अभिनंदन शहा यांच्या टीमने गेले काही महिने ग्रामीण भागाचा विचार करून विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धेला सामोरे कसे जाता येईल, याचा अभ्यास करत प्रणालीतच आमूलाग्र बदल केले.

## दखल घेण्याजोगा बदल

ग्रामीण भागातील स्वायत्तता मिळवून काळानुरूप स्वतःला बदलणारे हे पहिलेच महाविद्यालय आहे. त्यांनी केलेली तयारी दखल घेण्याजोगी आहे. पदव्या देणारे कारखाने ही संकल्पना बदलून कारखान्यांनी युवकांच्या प्लेसमेंटसाठी या महाविद्यालयात चालून यावे, असे आमूलाग्र बदल येथे झालेले आहेत. पुणे जिल्ह्यातील एक महाविद्यालय ज्या दिशेने जाते आहे, त्याची दखल इतर महाविद्यालयांनीही घेणे क्रमप्राप्त आहे.

### काय आहेत नवीन बदल...

पुस्तके छापील नाहीत, तर विद्यार्थ्यांनी ऑनलाइन ती बघून अभ्यास करायचा, कला शाखेच्या विद्यार्थ्याला वाणिज्य किंवा विज्ञान विषयातीलही अभ्यासक्रम करण्याची परवानगी, दैनंदिन अभ्यासक्रमात तीस टक्क्यांहून अधिकचा बदल, या अभ्यासक्रमासोबत प्रत्येक विद्यार्थ्याला महाविद्यालयाने दिलेल्या सत्तर विविध अभ्यासक्रमांपैकी एक निवडून तीन महिन्यांचे वेगळे प्रशिक्षण घ्यायचे, पुस्तकी पान ४ वर »

Tuljaram Chaturchand College Library Baramati
पा.नं.-१ व २ पाहा.


— दैनिक पुढारी दि. ८।६।२०१९ पान नं-५ मा. प्राचार्य साहेब

# टी. सी. महाविद्यालयात ८० कोर्सेस सुरू

बारामती : प्रतिनिधी

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात कौशल्याभिमुख व रोजगाराभिमुख असे ८० कोर्सेस सुरू करण्यात आले आहेत. याबाबत प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी माहिती दिली.

या महाविद्यालयाला विद्यापीठ अनुदान आयोगाने या शैक्षणिक वर्षापासून स्वायत्तता दर्जा प्रदान केला आहे. महाविद्यालयाने या शैक्षणिक स्वायत्ततेचा फायदा घेऊन अभ्यासक्रमामध्ये आमूलाग्र बदल करून घेतले आहेत. विद्यार्थ्यांना नियमीत पदवीबरोबर आवडीनुसार किमान पाच सर्टिफिकेट कोर्सेस पूर्ण करण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. या योजनेमध्ये कोणत्याही शाखेचा विद्यार्थी त्याच्या आवडीचे कोर्सेस निवडू शकतो. या कोर्सेसचे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये ७५ टक्के प्रॅक्टिकल व २५ टक्के थेअरी असेल. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढवून पूर्ण तयारीनुसार नोकरी



मिळविण्यास सक्षम होईल.

या स्किल डेव्हलपमेंट प्रोग्रॅममध्ये भाषेशी निगडित ६ कोर्सेस, सोशल सायन्सेस निगडित ११ कोर्सेस, शेती व शेतीपूरक व्यवसायासाठी ११ कोर्सेस, सॉफ्टवेअर संदर्भात ५ कोर्सेस, क्वालिटी कंट्रोलसंदर्भात ५ कोर्सेस, इलेक्ट्रॉनिकसंदर्भात ५ कोर्सेस, कॉम्प्युटर कौशल्यासाठी १४ कोर्सेस, बँकिंग अ‍ॅण्ड अकाउंटींगसंदर्भात ६ कोर्सेस, बिझनेस व रिटेल मॅनेजमेंटसंदर्भात १२ कोर्सेस, जर्नालिझम अ‍ॅण्ड मास कम्युनिकेशनसाठी ४ कोर्सेस आणि ग्रंथालयासंदर्भात २ असे कोर्सेस महाविद्यालयाने उपलब्ध करून दिलेले आहेत. या कोर्सेससाठी तज्ज्ञ प्राध्यापकांच्या नियुक्त्या महाविद्यालयाने केल्या आहेत.

ABS 8/6

दै. पुढारी दि ८।६।२०१९

Tuljaram Chaturchand College Library

सकाळ

बुधवार,
२६ जून २०१९

# अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, बारामती, जि.पुणे
## निविदा सूचना

आमच्या अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, बारामती, शैक्षणिक संकुल आवारात एम.बी.ए.कॉलेजजवळ नियोजित मुलांचे वसतिगृह, या इमारतीच्या बांधकामाकरीता अनुभवी व योग्य त्या वर्गामध्ये नोंदणीप्राप्त कंत्राटदाराकडून बी-१ प्रकारामध्ये सौलबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | इमारतीचे क्षेत्रफळ | मजले | अंदाजे बांधकाम खर्च रु. | बयाणा रक्कम रूपये | सुरक्षा अनामत | कामाचा कालावधी | निविदा फी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५११८.१० चौ.मी. | पार्किंग/ग्राऊंड + ३ | ८,६६,००,०००/- | अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १% रू.८,६६,०००/- बारामती येथे देय असलेल्या राष्ट्रीयकृत बँकेच्या डिमांड ड्राफ्टने फक्त | अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ५% (रोख ३% आणि बिलातुन २% | १८ महिने पावसाळ्या सहीत | १०,०००/- रोख |

सदर कामासाठी इच्छुक ठेकेदाराने किमान एका इमारतीचे काम ५० हजार चौ.फु.वे ते रू. ८ कोटी किंवा त्यापेक्षा जास्त रक्कमेचे काम कार्यादेश मिळाल्या पासुन १८ महिन्याच्या कालावधीत पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र पुराव्यासह निविदेसोबत सादर करणे आवश्यक आहे. कोऱ्या निविदा संस्थेच्या कार्यालयातून दि.२६/०६/२०१९ ते दि.०३/०७/२०१९ दरम्यान (सुट्टी सोडून) कार्यालयाच्या कालावधीत (स.११.०० ते सायं.५.०० वा.पर्यंत) उपलब्ध होतील भरलेल्या निविदा आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह संस्थेच्या कार्यालयात दि.०६/०७/२०१९ दु.३.०० वा.पर्यंत स्वीकारण्यात येतील प्री-बीड मिटींग दि.०४/०७/२०१९ रोजी सायं. ४:३० वा. संस्थेच्या सभागृहात होईल कोणतीही निविदा स्विकारणे अथवा कोणतेही कारण न देता सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार अनेकान्त एज्युकेशन सोसायटीने राखुन ठेवलेला आहे. संस्था कार्यालयाचा पत्ता : प्रशासन भवन, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय आवारात, बारामती, जि.पणे, फोन नं. (०२११२) २२१२०५

| आर्किटेक्ट | चेअरमन | सचिव |
|---|---|---|
| मिलिंद पावसकर ॲण्ड असोसिएटस.पुणे | बांधकाम समिती | अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, बारामती |

Chaturchand College Baramati

सकाळ
बुधवार, २६ जून २०१९ ७



बारामती : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या वर्धापन दिनानिमित्त अनेकांत नियतकालिकाचे प्रकाशन करताना मान्यवर.

# टी.सी. महाविद्यालयाने घडविले : वाघोलीकर

## वर्धापन दिनानिमित्त बारामतीत कार्यक्रम; अनेकांत नियतकालिकाचे प्रकाशन

**बारामती शहर, ता. २५ :** तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाने घडविले आहे, अशा शब्दांत अनेकांत एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे सचिव जवाहर वाघोलीकर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

महाविद्यालयाच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित समारंभात ते बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष अरहतदास सराफ अध्यक्षस्थानी होते.

या वेळी वाघोलीकर म्हणाले, "या महाविद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली आहे. १९६२ मध्ये अवघ्या ११९ विद्यार्थ्यांवर सुरू झालेल्या महाविद्यालयाची विद्यार्थी संख्या आता १४ हजारांवर गेली आहे. महाविद्यालयाला मिळालेला स्वायत्ततेचा दर्जा आणि त्यासाठी महाविद्यालयाने सुरू केलेले कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम आगामी काळात स्वायत्ततेचे आव्हान पेलू शकतील अशी मला खात्री वाटते."

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी केले. याप्रसंगी खजिनदार सुनील लेंगरेकर, मिलिंद वाघोलीकर, विकास लेंगरेकर, चंद्रवदन मुंबईकर, चंद्रगुप्त वाघोलीकर, डॉ. राजकुमार छाजेड, विद्या प्रतिष्ठानच्या विश्वस्त ॲड. नीलिमा गुजर, एम्सचे संचालक डॉ. एम. ए. लाहोरी, अनेकांत इंग्लिश मीडियमच्या प्राचार्य राखी माथूर, उपप्राचार्य डॉ. शिवाजी साठे, डॉ. अविनाश जगताप, डॉ. अजित तेळवे, डॉ. सचिन गाडेकर, रजिस्ट्रार अभिनंदन शहा उपस्थित होते. या प्रसंगी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाच्या अनेकांत नियतकालिकाचे प्रकाशन करण्यात आले.

College

रणशिंग - दि- २८।६।२०१९ - पा. नं - २

# अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

फोन नं. ०२११२-२२१२०५, २२२७२८

## भंगार व रद्दी विक्रीची निविदा

आमच्या महाविद्यालयातील जुने निरूपयोगी लोखंडी भंगार, काचसामान, जुने संगणक तसेच त्याच्या सोबतच्या अन्य वस्तू, वर्तमानपत्रे, पुस्तके, प्रयोगवही, मासिके, उत्तरपत्रिका, पुठ्ठे इ. प्रकारची रद्दी व भंगार सामान विकणे आहे. त्यासाठी निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांत सीलबंद पाकिटात पोस्टाने अगर समक्ष सुट्टीचे दिवस सोडून महाविद्यालयाचे कार्यालयात आणून द्याव्यात. भंगार व रद्दी विक्रीचे सर्व अधिकार महाविद्यालयाने राखून ठेवले आहेत.

**प्राचार्य** — तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

**सचिव** — अनेकान्त एज्युकेशन सोसायटी बारामती

Tuljaram Chaturchand College * Baramati * Library

सा- रणशिंग - दि - २८/६/२०१९ - पा. नं. - २

# अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे
# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय

कला, विज्ञान व वाणिज्य, बारामती

फोन नं. ०२११२-२२१२०५, २२२७२८

## पाहिजेत

शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी आमच्या महाविद्यालयासाठी हंगामी तत्त्वावर खालीलप्रमाणे पदे भरावयाची आहेत.

**सिस्टम ॲडमिनिस्ट्रेटर-१ पद**-हार्डवेअर ॲण्ड नेटवर्कींग, एम.सी.एस,ए. किंवा सी.सी.एन.ए., अनुभव असणाऱ्यांस प्राधान्य.

**क्लार्क-४ पदे**-कॉमर्स शाखेचा पदवीधर, मराठी व इंग्लिश टायपिंग, एम.एस.सी.आय.टी. टॅली ६.५ चे ज्ञान आवश्यक.

**रिसेप्शनिस्ट-१ पद**- पदवीधर मराठी व इंग्लिश टायपिंग. अनुभव असणाऱ्या महिला उमेदवारांना प्राधान्य.

**शिपाई-१२ पदे**- पदवीधर, संगणकज्ञान आवश्यक.

इच्छूक उमेदवारांनी योग्य त्या कागदपत्रासह जाहिरात प्रकाशित झाल्यापासून ८ दिवसांत मा.प्राचार्य, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती यांचे नावाने लेखी अर्ज वरील पत्त्यावर पोस्टाद्वारे/प्रत्यक्ष अर्ज करावा. (जैन उमेदवारास प्राधान्य.)


**प्राचार्य**
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

**सचिव**
अनेकान्त एज्युकेशन सोसायटी बारामती

Tuljaram Chaturchand College Library * Baramati *

लोकवार्ता - दि - २५।६।२०१९ - पा. नं - ४

# तु.च.महाविद्यालयाच्या अनेकान्त नियतकालिकाचे प्रकाशन



**बारामती:-** तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या नियतकालिकाचे प्रकाशन नुकतेच करण्यात आले. यावेळी तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाने घडविले आहे, अशा शब्दात अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या तु.च.महाविद्यालयाचे सचिव जवाहर वाघोलीकर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

महाविद्यालयाच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित समारंभात ते बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष अरहतदास सराफ अध्यक्षस्थानी होते.

यावेळी वाघोलीकर म्हणाले, या महाविद्यालयाने शैक्षणिक वर्षात उत्तुंग भरारी घेतली आहे. १९६२ मध्ये अवघ्या ११९ विद्यार्थ्यांवर सुरु झालेल्या महाविद्यालयाची विद्यार्थी संख्या आता १४ हजारांवर गेली आहे. महाविद्यालयाला मिळालेला स्वायत्ततेचा दर्जा आणि त्यासाठी महाविद्यालयाने सुरु केलेले कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम आगामी काळात स्वायत्ततेचे आव्हान पेलू शकतील अशी मला खात्री वाटते.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरुमकर यांनी केले. यावेळी खजिनदार सुनिल लोंगरेकर, मिलिंद वाघोलीकर, विक्रम लोंगरेकर, चंद्रवदन मुंबईकर, चंद्रगुप्त वाघोलीकर, डॉ.राजकुमार छाजेड, विद्या प्रतिष्ठानच्या विश्वस्त ॲड.नीलीमा गुजर, एम्सचे संचालक डॉ.एम.ए.लाहोरी, अनेकान्त इंग्लिश मीडियमच्या प्राचार्य राखी माथूर, उपप्राचार्य डॉ.शिवाजी साठे, डॉ.अविनाश जगताप, ॲड.अजित तेळवे, डॉ.सचिन गाडेकर, रजिस्ट्रार अभिनंदन शहा आदी उपस्थित होते. यावेळी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाच्या अनेकान्त नियतकालिकाचे प्रकाशन करण्यात आले.

Tuljaram Chaturchand College Library * Baramati *

मा. प्राचार्य साहेब.

दै. पुढारी. दि. २८/६/२०१९. पा. नं. ८

# टी.सी. महाविद्यालय स्वायत्ततेचे आव्हान पेलेल

## 'अनेकान्त'चे सचिव वाघोलीकर यांचे मत



अनेकान्त नियतकालिकेचे प्रकाशन करताना अरहतदास शहा, जवाहर वाघोलीकर व अन्य.

**बारामती : प्रतिनिधी**

तुळजाराम चतुरचंद (टी.सी.) महाविद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली आहे. १९६२ मध्ये ११९ विद्यार्थ्यांवर सुरू झालेल्या महाविद्यालयाची विद्यार्थी संख्या आता १४ हजारांवर गेली आहे. ५७ वर्षांत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे एका महाकाय वटवृक्षात रूपांतर झाले आहे. नुकताच महाविद्यालयाला मिळालेला स्वायत्ततेचा दर्जा आणि त्यासाठी महाविद्यालयाने सुरू केलेले कौशल्याधिष्ठीत अभ्यासक्रम आगामी काळात स्वायत्ततेचे आव्हान पेलू शकतील, अशी अपेक्षा अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे सचिव जवाहर वाघोलीकर यांनी व्यक्त केली.

तुळजाराम महाविद्यालयाच्या ५७ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष अरहतदास शहा होते. खजिनदार सुनील शहा, मिलिंद वाघोलीकर, विकास शहा, चंद्रवदन शहा, चंद्रगुप्त वाघोलीकर, डॉ. राजकुमार छाजेड, ॲड. नीलिमा गुजर, अनेकांत इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड स्टडीजचे संचालक डॉ. एम. ए. लाहोरी, अनेकांत इंग्लिश मेडियमच्या प्राचार्य राखी माथूर आदी यावेळी उपस्थित होते. कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाच्या अनेकांत नियतकालिकाचे प्रकाशन याप्रसंगी करण्यात आले. तसेच अनेकान्त इंग्लिश मेडियम स्कूल, अनेकांत इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड स्टडीज आणि महाविद्यालयातील गुणवत्ता वाढ केलेल्या प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

वाघोलीकर म्हणाले, महाविद्यालयाच्या प्रगतीचा उंचावलेला आलेख बघत असताना संस्थेच्या पूर्वजांनी दिलेल्या उदंड योगदानामुळेच महाविद्यालयाने भरारी घेतली आणि हे उज्ज्वल यशाचे दिवस आपण पाहू शकलो. त्यांनी कष्टाने उभी केलेल्या या संस्थेचा नावलौकीक कायम ठेवू.

प्रास्ताविकामध्ये प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी संस्था व महाविद्यालयाच्या यशस्वी वाटचालीचा आढावा घेतला. संस्थेप्रती कृतज्ञता व्यक्त केली. स्वायत्ततेच्या माध्यमातून बदलत्या काळाच्या अनुषंगाने नव्याने सुरू केलेले अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना प्रेरक आणि दिशादर्शक ठरतील, अशी आशा त्यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमास महाविद्यालयातील उपप्राचार्य डॉ. शिवाजी साठे, डॉ. अविनाश जगताप, डॉ. अजित तेळवे, डॉ. सचिन गाडेकर, रजिस्ट्रार अभिनंदन शहा आदी उपस्थित होते.

Tuljaram Chaturchand College Library Baramati

दैनिक सकाळ दि. २७/६/२०१९ पान.नं. ७

# अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, बारामती, जि.पुणे

## निविदा सूचना

अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, बारामती, शैक्षणिक संकुल आवारात एम.बी.ए.कॉलेजजवळ नियोजित मुलांचे वसतिगृह, या इमारतीच्या ाकरीता अनुभवी व योग्य त्या वर्गामध्ये नोंदणीप्राप्त कंत्राटदाराकडून बी-१ प्रकारामध्ये सीलबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

| इमारतीचे क्षेत्रफळ | मजले | अंदाजे बांधकाम खर्च रू. | बयाणा रक्कम रुपये | सुरक्षा अनामत | कामाचा कालावधी | निविदा |
|---|---|---|---|---|---|---|
| ५१४८.१० चौ.मी. | पार्किंग/ ग्राऊंड + ३ | ८,६६,००,०००/- | अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १% रू.८,६६,०००/- बारामती येथे देय असलेल्या राष्ट्रीयकृत बँकेच्या डिमांड ड्राफ्टने फक्त | अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ५% (रोख ३% आणि बिलातुन २% | १८ महिने पावसाळया सहीत | १०,०० रोख |

मासाठी इच्छुक ठेकेदाराने किमान एका इमारतीचे काम ५० हजार चौ.फु.वे ते रू. ८ कोटी किंवा त्यापेक्षा जास्त रक्कमेचे काम कार्यादेश मिळाल्या त्याच्या कालावधीत पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र पुराव्यासह निविदेसोबत सादर करणे आवश्यक आहे. कोऱ्या निविदा संस्थेच्या कार्यालयातून ०६/२०१९ ते दि.०३/०७/२०१९ दरम्यान (सुट्टी सोडून) कार्यालयाच्या कालावधीत (स.११.०० ते सायं.५.०० वा.पर्यंत) उपलब्ध होतील भरलं आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह संस्थेच्या कार्यालयात दि.०६/०७/२०१९ दु.३.०० वा.पर्यंत स्वीकारण्यात येतील <u>प्री-बीड मिटींग</u> <u>०७/२०१९ रोजी सायं. ४:३० वा. संस्थेच्या सभागृहात होईल</u> कोणतीही निविदा स्विकारणे अथवा कोणतेही कारण न देता सर्व निविदा नाकारण्या र अनेकान्त एज्युकेशन सोसायटीने राखुन ठेवलेला आहे. <u>संस्था कार्यालयाचा पत्ता :</u> प्रशासन भवन, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय आवारात, , जि.पुणे - फोन नं. (०२११२) २२१२०५

[5519] EXT. - 703

2

| आर्किटेक्ट | चेअरमन | सचिव |
|---|---|---|
| मिलिंद पावसकर ॲण्ड असोसिएटस.पुणे | बांधकाम समिती | अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, बारामती |

Tuljaram Chaturchand College Baramati

मा. प्राचार्य साहेब

दैनिक सकाळ दि. २७/६/२०१९. पान नं. ७



बारामती : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या वर्धापन दिनानिमित्त अनेकांत नियतकालिकाचे प्रकाशन करताना मान्यवर.

# टी.सी. महाविद्यालयाने घडविले : वाघोलीकर

## वर्धापन दिनानिमित्त बारामतीत कार्यक्रम; अनेकांत नियतकालिकाचे प्रकाशन

**बारामती शहर, ता. २५ :** तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाने घडविले आहे, अशा शब्दांत अनेकांत एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे सचिव जवाहर वाघोलीकर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

महाविद्यालयाच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित समारंभात ते बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष अरहतदास सराफ अध्यक्षस्थानी होते.

या वेळी वाघोलीकर म्हणाले, "या महाविद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली आहे. १९६२ मध्ये अवघ्या ११९ विद्यार्थ्यांवर सुरू झालेल्या महाविद्यालयाची विद्यार्थी संख्या आता १४ हजारांवर गेली आहे. महाविद्यालयाला मिळालेला स्वायत्ततेचा दर्जा आणि त्यासाठी महाविद्यालयाने सुरू केलेले कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम आगामी काळात स्वायत्ततेचे आव्हान पेलू शकतील अशी मला खात्री वाटते."

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी केले. याप्रसंगी खजिनदार सुनील लेंगरेकर, मिलिंद वाघोलीकर, विकास लेंगरेकर, चंद्रवदन मुंबईकर, चंद्रगुप्त वाघोलीकर, डॉ. राजकुमार छाजेड, विद्या प्रतिष्ठानच्या विश्वस्त ॲड. नीलिमा गुजर, एम्सचे संचालक डॉ. एम. ए. लाहोरी, अनेकांत इंग्लिश मीडियमच्या प्राचार्य राखी माथूर, उपप्राचार्य डॉ. शिवाजी साठे, डॉ. अविनाश जगताप, डॉ. अजित तेळवे, डॉ. सचिन गाडेकर, रजिस्ट्रार अभिनंदन शहा उपस्थित होते. या प्रसंगी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाच्या अनेकांत नियतकालिकाचे प्रकाशन करण्यात आले.

Tuljaram Chaturchand College
Baramati

पुणे, गुरुवार, २७ जून २०१९ MY पुणे जिल्हा पुढारी ७

# टी.सी. महाविद्यालय स्वायत्ततेचे आव्हान पेलेल

## 'अनेकान्त'चे सचिव वाघोलीकर यांचे मत



अनेकान्त नियतकालिकेचे प्रकाशन करताना अरहतदास शहा, जवाहर वाघोलीकर व अन्य.

**बारामती : प्रतिनिधी**

तुळजाराम चतुरचंद (टी.सी.) महाविद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली आहे. १९६२ मध्ये ११९ विद्यार्थ्यांवर सुरू झालेल्या महाविद्यालयाची विद्यार्थी संख्या आता १४ हजारांवर गेली आहे. ५७ वर्षांत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे एका महाकाय वटवृक्षात रूपांतर झाले आहे. नुकताच महाविद्यालयाला मिळालेला स्वायत्ततेचा दर्जा आणि त्यासाठी महाविद्यालयाने सुरू केलेले कौशल्याधिष्ठीत अभ्यासक्रम आगामी काळात स्वायत्ततेचे आव्हान पेलू शकतील, अशी अपेक्षा अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे सचिव जवाहर वाघोलीकर यांनी व्यक्त केली.

तुळजाराम महाविद्यालयाच्या ५७ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष अरहतदास शहा होते. खजिनदार सुनील शहा, मिलिंद वाघोलीकर, विकास शहा, चंद्रवदन शहा, चंद्रगुप्त वाघोलीकर, डॉ. राजकुमार छाजेड, ॲड. नीलिमा गुजर, अनेकांत इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड स्टडीजचे संचालक डॉ. एम. ए. लाहोरी, अनेकांत इंग्लिश मेडियमच्या प्राचार्य राखी माथूर आदी यावेळी उपस्थित होते. कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाच्या अनेकांत नियतकालिकाचे प्रकाशन याप्रसंगी करण्यात आले. तसेच अनेकान्त इंग्लिश मेडियम स्कूल, अनेकांत इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड स्टडीज आणि महाविद्यालयातील गुणवत्ता वाढ केलेल्या प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

वाघोलीकर म्हणाले, महाविद्यालयाच्या प्रगतीचा उंचावलेला आलेख बघत असताना संस्थेच्या पूर्वजांनी दिलेल्या उदंड योगदानामुळेच महाविद्यालयाने भरारी घेतली आणि हे उज्ज्वल यशाचे दिवस आपण पाहू शकलो. त्यांनी कष्टाने उभी केलेल्या या संस्थेचा नावलौकीक कायम ठेवू.

प्रास्ताविकामध्ये प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी संस्था व महाविद्यालयाच्या यशस्वी वाटचालीचा आढावा घेतला. संस्थेप्रती कृतज्ञता व्यक्त केली. स्वायत्ततेच्या माध्यमातून बदलत्या काळाच्या अनुषंगाने नव्याने सुरू केलेले अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना प्रेरक आणि दिशादर्शक ठरतील, अशी आशा त्यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमास महाविद्यालयातील उपप्राचार्य डॉ. शिवाजी साठे, डॉ. अविनाश जगताप, डॉ. अजित तेळवे, डॉ. सचिन गाडेकर, रजिस्ट्रार अभिनंदन शहा आदी उपस्थित होते.

Baramati * Tuljaram Chaturchand College Library

दै- पुढारी- दि- २८/६/२०१९ पा.नं-५.

दै. पुढारी दि २८/६/१९ पान ५

Anekant Education Society's

## Tuljaram Chaturchand College of Arts, Science & Commerce, Baramati

(Autonomous)

**Jain Religious Minority Institution**

**NAAC A+ (CGPA 3.55)**

Phone No- 02112-222405 website - www.tccollege.org

## Walk - In Interview on 08/07/2019

invited eligible candidate along with documents for the following posts of Assistant Professor in Senior College Grant Section on C.H.B. for the Academic year **2019-2020.**

| Sr. No. | Subject | No. of Post/s | Sr. No. | Subject | No. of Post/s |
|---|---|---|---|---|---|
| 1 | English | 04 | 8 | Statistics | 4 |
| 2 | Defence Stud. | 04 | 9 | Electronics | 2 |
| 3 | Economics | 02 | 10 | Microbiology | 2 |
| 4 | Commerce | 02 | 11 | Geography | 2 |
| 5 | Physics | 02 | 12 | Psychology | 2 |
| 6 | Botany | 02 | 13 | Sociology | 2 |
| 7 | Zoology | 06 | **Total Post/s** | | 36 |

- Essential Qualification :- As per Rule of UGC, Govt. of Maharashtra and Savitribai Phule Pune University, Pune.
- Preference will be given to **'Jain'** Candidates.
- The posts are subject to availability of actual workload.

**Principal**
Tuljaram Chaturchand College,
Baramati

**Secretary**
Anekant Education Society,
Baramati

Tuljaram Chaturchand College * Library * Baramati

मा. प्राचार्यसाहेब.

दै. सकाळ दि- २९/६/२०१९ पा. नं.-५.

दै. सकाळ दि २९/६/१९ पान ५

Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College, of

Arts, Science & Commerce, Baramati.
(Autonomous)
Jain Religious Minority Institution
NAAC A+ (CGPA 3.55)

Phone No. 02112 -222405 web site- www.tccollege.org

## Walk – In Interview on 08/07/2019

Invited eligible candidate along with documents for the following posts of Assistant Professor in Senior College Grant Section on C.H.B. for the Academic year 2019-2020.

| Sr. No. | Subject | No.of Post/s | Sr. No. | Subject | No.of Post/s |
|---|---|---|---|---|---|
| 1 | English | 04 | 8 | Statistics | 04 |
| 2 | Defence Stud. | 04 | 9 | Electronics | 02 |
| 3 | Economics | 02 | 10 | Microbiology | 02 |
| 4 | Commerce | 02 | 11 | Geography | 02 |
| 5 | Physics | 02 | 12 | Psychology | 02 |
| 6 | Botany | 02 | 13 | Sociology | 02 |
| 7 | Zoology | 06 | | Total Post/s | 36 |

*Essential Qualification –As per Rule of UGC, Govt. of Maharashtra and Savitribai Phule Pune University, Pune.
*Preference will be given to 'Jain Candidates.'
*The posts are subject to availability of actual workload.

Principal
Tuljaram Chaturchand College,
Baramati

Secretary
Anekant Education Society
Baramati

Tuljaram Chaturchand College * Baramati * Library

ABS
29.6.19

साप्ताहिक रणशिंग दि. ४/७/२०१९ पान नं. ९५.

साप्ताहिक रणशिंग
दि. ४/७/२०१९

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाची उत्तुंग भरारी- जवाहर शाह (वाघोलीकर)

बारामती · तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली आहे. १६२ साली १६६ विद्यार्थ्यांवर सुरु झालेल्या महाविद्यालयाची विद्यार्थी संख्या आता १४००० वर गेली आहे. ५७ वर्षात तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे एका महाकाय वटवृक्षात रुपांतर झाले आहे. नुकताच महाविद्यालयाला मिळालेला स्वायत्ततेचा दर्जा आणि त्यासाठी महाविद्यालयाने सुरु केलेले कौशल्याधिष्टीत अभ्यासक्रम आगामी काळात स्वायत्ततेचे आव्हान पेलू शकतील अशी मला खात्री वाटते, असे प्रतिपादन अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे सचिव जवाहर शाह (वाघोलीकर) यांनी केले. अध्यक्षस्थानी अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री. ...हतदास हिराचंद शहा (सराफ) होते. स्वागत व प्रास्ताविकामध्ये प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी संस्था व महाविद्यालयाच्या यशस्वी वाटचालीचा आढावा घेतला. संस्थेप्रती कृतज्ञता व्यक्त केली. स्वायत्ततेच्या माध्यमातून बदलत्या काळाच्या अनुषंगाने नव्याने सुरु केलेले अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना प्रेरक आणि दिशादर्शक ठरतील अशी आशा त्यांनी व्यक्त केली. याप्रसंगी संस्थेचे खजिनदार श्री.सुनील शिवलाल शहा (लॅंगरेकर), मिलिंद राजकुमार शाह (वाघोलीकर), विकास शशिकांत शहा (लॅंगरेकर), चंद्रवदन विद्याचंद्र शहा (मुंबईकर), श्री.चंद्रगुप्त माणिकलाल शाह (वाघोलीकर), डॉ.राजकुमार छाजेड ॲडव्होकेट नीलिमा गुजर, ट्रस्टी, विद्या प्रतिष्ठान, बारामती, अनेकांत इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड स्टडीजचे संचालक डॉ.एम.ए. लाहोरी, अनेकांत इंग्लिश मिडियंमच्या प्राचार्य श्रीमती राखी माथूर हे उपस्थित होते. कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाच्या अनेकांत नियतकालिकाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच अनेकान्त इंग्लिश मिडीयम स्कुल, अनेकांत इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड स्टडीज आणि महाविद्यालयातील गुणवत्ता वाढ केलेले प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचा विशेष सत्कार करण्यात आला. विशेषत्वाने सेट/नेट, पीएचडी, शैक्षणिक अर्हतेत केलेली वाढ, पुस्तक प्रकाशन, मेजर, मायनर संशोधन प्रकल्प, मिळालेले विविध पुरस्कार, अभ्यासमंडळावर निवड तसेच आंतरराष्ट्रीय परिषदेत शोधनिबंध सादर केलेल्या प्राध्यापकांचा सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना अनेकान्त एज्युकेशन संस्थेचे सचिव जवाहर शाह (वाघोलीकर) म्हणाले की, महाविद्यालयाच्या प्रगतीचा उंचावलेला आलेख बघत असताना संस्थेच्या पूर्वजांनी दिलेल्या उदंड योगदानामुळेच महाविद्यालयाने भरारी घेतली आणि हे उज्वल यशाचे दिवस आपण पाहू शकलो. या कार्यक्रमास महाविद्यालयातील उपप्राचार्य डॉ.शिवाजी साठे, डॉ. अविनाश जगताप, डॉ.अजित तेळवे, डॉ.सचिन गाडेकर, रजिस्ट्रार श्री. अभिनंदन शहा, महाविद्यालयातील सेवानिवृत्त प्राध्यापक, वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

Tuljaram Chaturchand College * Baramati *

मा० प्राचार्य साहेब,


साप्ताहिक वतन की लकीर, दि. ४/०७/२०१९ पान.नं.४

दि ०४/०७/२०१९ पान.नं. ४

सा.वतन की लकीर

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचा ५७ वा वर्धापन दिन संपन्न

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाची उत्तुंग भरारी –जवाहरशेठ शाह



बारामती(वार्ताहर): तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली आहे. १९६२ साली ११९ विद्यार्थ्यांवर सुरु झालेल्या महाविद्यालयाची विद्यार्थी संख्या आता १४ हजारावर गेली आहे. ५० वर्षात तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे एका महाकाय वटवृक्षात रूपांतर झाले आहे. नुक्ताच महाविद्यालयाला मिळालेला स्वायत्ततेचा दर्जा आणि त्यासाठी महाविद्यालयाने सुरु केलेले कौशल्याधिष्ठीत अभ्यासक्रम आगामी काळात स्वायत्ततेचे आव्हान पेलू शकतील अशी मला खात्री वाटते, असे प्रतिपादन अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे सचिव जवाहरशेठ शाह (वाघोलीकर) यांनी केले.

अध्यक्षस्थानी अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अरहतदास हिराचंद शहा (सराफ) होते. स्वागत व प्रास्ताविकामध्ये प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर यांनी संस्था व महाविद्यालयाच्या यशस्वी वाटचालीचा आढावा घेतला. संस्थेप्रती कृतज्ञता व्यक्त केली. स्वायत्ततेच्या माध्यमातून बदलत्या काळाच्या अनुषंगाने नव्याने सुरु केलेले अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना प्रेरक आणि दिशादर्शक ठरतील अशी आशा त्यांनी व्यक्त केली. महाविद्यालयाच्या प्रगतीचा उंचावलेला आलेख बघत असताना संस्थेच्या पूर्वजांनी दिलेल्या उदंड योगदानामुळेच महाविद्यालयाने भरारी घेतली आणि हे उज्वल यशाचे दिवस आपण पाहू शकलो असेही शेवटी त्यांनी यावेळी सांगितले.

याप्रसंगी संस्थेचे खजिनदार सुनील शहा (लेंगरेकर), मिलिंद शाह (वाघोलीकर), विकास शहा (लेंगरेकर), चंद्रवदन शहा (मुंबईकर), चंद्रगुप्त शाह (वाघोलीकर), डॉ.राजकुमार छाजेड विद्या प्रतिष्ठानच्या ट्रस्टी ॲड.नीलिमा गुजर, अनेकांत इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट ऍण्ड स्टडीजचे संचालक डॉ.एम.ए.लाहोरी, अनेकांत इंग्लिश मिडियमच्या प्राचार्य श्रीमती राखी माथूर हे उपस्थित होते.

यावेळी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाच्या अनेकांत नियतकालिकाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच अनेकान्त इंग्लिश मिडीयम स्कुल, अनेकांत इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट ऍण्ड स्टडीज आणि महाविद्यालयातील गुणवत्ता वाढ केलेले प्राध्यापक,शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचा विशेष सत्कार करण्यात आला. विशेषत्वाने सेट/नेट, पीएचडी, शैक्षणिक अर्हतेत केलेली वाढ, पुस्तक प्रकाशन, मेजर, मायनर संशोधन प्रकल्प, मिळालेले विविध पुरस्कार, अभ्यासमंडळावर निवड तसेच आंतरराष्ट्रीय परिषदेत शोधनिबंध सादर केलेल्या प्राध्यापकांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना अनेकान्त एज्युकेशन संस्थेचे सचिव जवाहर शाह (वाघोलीकर) म्हणाले की,

या कार्यक्रमास महाविद्यालयातील उपप्राचार्य डॉ.शिवाजी साठे, डॉ.अविनाश जगताप, डॉ.अजित तेळवे, डॉ.सचिन गाडेकर, रजिस्ट्रार अभिनंदन शहा, महाविद्यालयातील सेवानिवृत्त प्राध्यापक, वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

Tuljaram Chaturchand College * Baramati *

०२८
५४१७१

मा. प्राचार्य साहेब

दैनिक पुढारी दि. ३/७/२०१९ पान.नं.६

# टीसी महाविद्यालयात तंबाखूविरोधी जागृती

बारामती : प्रतिनिधी

येथील इंडियन डेंटल असोसिएशन व फलटण शाखा तसेच तुळजाराम चतुरचंद (टीसी) महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास मंडळांतर्गत जागतिक 'डॉक्टर्स डे'निमित्त तंबाखूविरोधी जागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर होते.

इंडियन डेन्टल असोसिएशनच्या बारामती-फलटण शाखेच्या अध्यक्षा डॉ. वैशाली कोकरे, डॉ. मंदार पाटील, डॉ. सौरभ दोशी, डॉ. प्रीती शहा, डॉ. शीतल झारगड, डॉ. ऋतुजा पिसे, डॉ. विक्रम फरांदे, डॉ. सोनिया शहा, डॉ. गौरव पारख आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. नेत्रा सिकची यांचे तंबाखू व तंबाखूजन्य सेवनाने मानवी आरोग्यावर होणारे परिणाम या विषयावर व्याख्यान झाले. कोणत्याही प्रकारची तंबाखू ही आरोग्याला घातकच आहे. तंबाखूतील निकोटीन व्यक्तीला व्यसनाधीन बनवते. तंबाखूत कॅन्सरला कारणीभूत ठरणारे २८ प्रकारची रासायनिक द्रव्ये असतात. असंख्य कुटुंब तंबाखूच्या सेवनाने उध्वस्त झालेली आहेत. त्यामुळे व्यसनांपासून दूर रहावे असा सल्ला त्यांनी दिला. तंबाखू सेवनाने जीभ, घसा, पोट, किडनी, अन्ननलिका आणि फुफ्फुसाचा कॅन्सर होतो तसेच हाडांची घनता कमी होते, असे डॉ. नेत्रा सिकची यांनी सांगितले.




तुळजाराम महाविद्यालयात इंडियन डेंटल असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर.


असोसिएशनच्या अध्यक्षा डॉ. वैशाली कोकरे म्हणाल्या की, गुटखा, मावा, सिगारेटस यासारख्या व्यसनांच्या आहारी तरुण मुले जातात. सिगारेट्समध्ये जीवघेणे रासायनिक द्रव्ये असून ती मातीत नष्ट व्हायला २५ वर्षांचा कालावधी लागतो. म्हणून तंबाखूजन्य पदार्थांच्या आधीन जाऊ नये, असा सल्ला त्यांनी दिला. यावेळी आरोग्यशपथ विद्यार्थी व उपस्थितांनी घेतली.

आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर म्हणाले की, व्यसनांपासून दूर करण्याचे सभोवतालच्या व्यसनी लोकांना शहाणे करून सोडण्याचे काम आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी एक ब्रँड अँबेसिडर बनून करणार आहेत.

प्रास्ताविक विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. भगवान माळी यांनी केले. प्रा. विवेक बळे व प्रा. क्रांतीलाल गायकवाड यांनी संयोजन व सूत्रसंचालन केले. तर डॉ. सीमा नाईक-गोसावी यांनी आभार मानले.

साप्ताहिक रणशिंग दि. ११/७/२०१९. पान नं. १४

# तु.च. महाविद्यालयाचा पालखी मार्गावरील स्तुत्य उपक्रम संपन्न



बारामती-निर्मलवारी, स्वस्थ वारी' या उपक्रमांतर्गत गेल्या सोळा वर्षांपासून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांर्गत राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी पालखी मार्गावर साफ स्वच्छतेचे काम करत असतात. वारीत चालणाऱ्या प्रत्येक वारकऱ्याला हरतऱ्हेची मदत हे स्वयंसेवक करत असतात. यावर्षी उंडवडी-सुपे या ठिकाणी पालखी मुक्कामाच्या वेळी विद्यापीठातल्या विद्यार्थ्यांबरोबर तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे विद्यार्थी दोन दिवस या ठिकाणी स्वयंसेवक म्हणून आपली महत्वपूर्ण जबाबदारी पार पाडत होते. वारकऱ्यांना मार्ग दाखविणे, त्यांच्या मुक्कामाच्या ठिकाणापर्यंत त्यांना पोहचविणे, त्यांच्या आरोग्याची विचारपूस करणे आणि त्यांना आवश्यक असणाऱ्या सुविधांविषयी माहिती करून देणे. यासारखे महत्वपूर्ण कार्य महाविद्यालयीन युवक युवती करत होत्या. या विद्यार्थ्यांबरोबर उंडवडी सुपे येथील ग्रामस्थांनी ही बहुमोल मदत वारकऱ्यांना केली. पालखी आल्यापासून या विद्यार्थ्यांनी साफ स्वच्छतेचे अतिशय उत्तम नियोजन केल्यामुळे गावकऱ्यांमध्ये आणि पालखी विश्वस्थांमध्ये मोठे कौतुक होते आहे. पालखी पुढे मार्गस्थ झाल्यानंतर पालखी स्थळावरील निर्माल्य या विद्यार्थ्यांनी काही तासांमध्ये उचलून हे ठिकाण पूर्णतः स्वच्छ केले. वारकऱ्यांच्या पत्रावळ्या उचलून एकत्र करीत या विद्यार्थ्यांनी त्याचे कंपोस्ट खत करण्यासाठी ते काही खड्ड्यांमध्ये टाकले व त्यावर आवश्यक असणारे रसायन फवारले. या कंपोस्ट खतांचा वापर पालखी मार्गावर जे वृक्षारोपण झाले आहे त्यासाठी केला जाणार असल्याचे राष्ट्रीय सेवा योजनेचे अधिकारी प्रा. विलास कर्डीले यांनी सांगितले. या योजनेमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वारीतील आयोजन समितीचे अध्यक्ष श्री. राजेश पांडे, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्राचार्य संजय चाकणे, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ.प्रभाकर देसाई यांचे मार्गदर्शन लाभले. पालखी बरोबर चालणारे विद्यार्थी दोन दिवसाच्या मुक्कामासाठी तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात आलेले आहेत. त्यांच्या स्वागतासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, उपप्राचार्य डॉ.शिवाजी साठे, डॉ.अविनाश जगताप, डॉ.अजित तेळवे आणि प्रबंधक अभिनंदन शहा यांच्याबरोबर कार्यक्रम अधिकारी, प्रा.विलास कर्डीले, प्रा.वैभव लांडगे आणि डॉ.चंद्रकांत कांबळे व त्यांचे सहकारी प्राध्यापक उपस्थित होते.

Tuljaram Chaturchand College Library

दैनिक पुढारी (महाराष्ट्र) दि. ११/७/२०१९ पान नं. ८

# मुक्त विद्यापीठातील १७ अभ्यासक्रम बंद

## युजीसीचा निर्णय : ४ लाख विद्यार्थी पदव्युत्तर, व्यावसायिक शिक्षणापासून राहणार वंचित

सांगली : प्रतिनिधी

परिस्थितीमुळे ज्यांना शिक्षण घेता आले नाही, अशा गरीब व गरजू विद्यार्थ्यांसाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे पदव्युत्तर तसेच व्यावसायिक शिक्षण देण्याची व्यवस्था शासनाने केली होती. परंतु युजीसीने विद्यापीठामार्फत चालविण्यात येणारे १७ पदव्युत्तर अभ्यासक्रम बंद केले आहेत. त्यामुळे या विद्यार्थ्यांना आता मुक्त विद्यापीठात उच्च शिक्षणाची दारे बंद झाली आहेत.

याबाबत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे संचालक प्रा. दादासाहेब मोरे म्हणाले, बहुजन समाजातील गोरगरीब विद्यार्थ्यांची सोय व्हावी यासाठी पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकविले जात होते. त्याचबरोबर या विद्यार्थ्यांना तात्काळ नोकरी उपलब्ध व्हावी यासाठी शासनाने मुक्त विद्यापीठातर्फे काही व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू केले होते. परंतु युजीसीने त्यापैकी १७ अभ्यासक्रम बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. ते अभ्यासक्रम आवश्यक असल्याने तात्काळ सुरू करावेत असे निवेदन युजीसीला देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

युजीसीने बंद केलेले अभ्यासक्रम असे : बॅचलर ऑफ सोशल वर्कर (बीएसडब्ल्यू), मास्टर ऑफ सोशल वर्कर (एमएसडब्ल्यू), मास्टर ऑफ आर्ट (मराठी, हिंदी, इकॉनॉमिक्स, पोलिटिकल सायन्स, सोशिऑलॉजी, हिस्ट्री, पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन, बॅचलर ऑफ सायन्स (हॉस्पिटॅलिटी स्टडिज् अँड केटरींग सर्व्हिस, हॉस्पिटॅलिटी अँड टुरिझम स्टडिज्, इंटिरिअर डिझाईन, फॅशन डिझाईन, लॅबोरेटरी टेक्निशियन), बी.बी.ए. (बिझनेस प्रोसेस मॅनेजमेंट), बॅचलर ऑफ आर्टस् (योगा अँड नॅचरोपॅथी), मास्टर ऑफ आर्टस् (योगा अँड नॅचरोपॅथी). व्यावसायिक अभ्यासक्रम युजीसीने बंद केल्यामुळे गरीब विद्यार्थी रोजगारापासून वंचित राहणार आहेत. हे विषय तातडीने सुरू करावेत, अशी मागणीही मुक्त विद्यापीठाने केली आहे, अशी माहिती मोरे यांनी दिली.

### महाराष्ट्रात मराठी भाषेवरच गंडांतर

महाराष्ट्रात मुक्त विद्यापीठ सुरू करताना मराठी भाषा अध्यापनास प्राधान्य देण्याचा निर्णय शासनाने घेतला होता, परंतु युजीसीने एम. ए. मराठी विषयावरच बंदी आणली आहे. त्यामुळे मराठीचा प्रश्न गंभीर झालेला आहे. एकीकडे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याची मागणी होत आहे; तर दुसरीकडे मराठी विषय शिकवणेच बंद करण्यात आले आहे, हे मराठी भाषेवरील गंडांतर आहे. शासनाने बंद केलेले विषय सुरू करावेत, अशी मागणी विद्यार्थ्यांकडून होत आहे.

### चार लाख विद्यार्थी शिक्षणाला मुकणार

मुक्त विद्यापीठाच्या सहा लाखांपैकी चार लाख विद्यार्थी हे बी. ए.चे शिक्षण घेत आहेत. त्यांच्या एम. ए.ची सोय मुक्त विद्यापीठात होती. परंतु युजीसीने एम. ए.चे शिक्षणच बंद केले आहे. त्यामुळे चार लाख विद्यार्थी पदव्युत्तर शिक्षणाला मुकणार आहेत. या विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणार आहे. पारंपरिक महाविद्यालयात या विद्यार्थ्यांना एम. ए. साठी प्रवेश मिळणार नाही, त्यामुळे केवळ बी. ए. ची पदवीच त्यांना मिळणार आहे.

## यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचा २१ जुलै रोजी पदवीप्रदान सोहळा

सांगली : प्रतिनिधी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या वतीने विविध अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या सांगली जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना दि. २१ जुलै रोजी प्रमाणपत्र वितरण करण्यात येणार आहे. ही माहिती विभागीय संचालक दादासाहेब मोरे यांनी पत्रकार बैठकीत दिली.

ते म्हणाले, कोल्हापूर येथे विवेकानंद महाविद्यालयात सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम होणार आहे. या वेळी पदव्युत्तर, पदवी, पदविका आणि प्रमाणपत्र शिक्षणक्रम पूर्ण करणाऱ्या ८ हजार ८९० विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण करण्यात येणार आहे. विद्यापीठाचे कुलगुरू ई. वायुनंदन, कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे, परीक्षा नियंत्रक डॉ. अर्जुन घाटुळे, प्रभारी संचालक प्रवीण घोडेस्वार उपस्थित राहणार आहेत.

प्रा. मोरे म्हणाले, मुक्त विद्यापीठातर्फे दरवर्षी नाशिक येथील मुख्यालयात पदवीदान कार्यक्रम होतो. परंतु विद्यापीठाचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र असल्याने पदवीदान कार्यक्रमासाठी सर्वच विद्यार्थ्यांना उपस्थित राहता येत नाही. त्यामुळे कोल्हापूर विभागीय केंद्रातर्फे गेल्या वर्षापासून विभागातील चारही जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र वितरण करण्यात येते. त्याला प्रतिसाद मिळाल्यानंतर यावर्षी पदवीदान कार्यक्रम घेण्याचे ठरले.

Tuljaram Chaturchand College
Library
Baramati

मा.प्राचार्यसाहेब

साप्ताहिक 'रणशिंग' दि.११/७/२०२१. पान नं.१०.

# तु. च. महाविद्यालयात 'डॉक्टर्स डे' निमित्त तंबाखूविरोधी जागृती अभियान संपन्न




बारामती - येथील इंडियन डेंटल असोसिएशन बारामती व फलटण शाखा व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास मंडळांतर्गत जागतिक 'डॉक्टर्स डे' निमित्त तंबाखूविरोधी जागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ.नेत्रा सिकची यांचे तंबाखू व तंबाखूजन्य सेवनाने मानवी आरोग्यावर होणारे परिणाम या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर होते. इंडियन डेन्टल असोसिएशनच्या बारामती-फलटण शाखेच्या अध्यक्षा डॉ. वैशाली कोकरे, डॉ.मंदार पाटील, डॉ.सौरभ दोशी, डॉ.प्रीती शहा, डॉ.शीतल झारगड, डॉ.ऋतुजा पिसे, डॉ.विक्रम फरांदे, डॉ.सोनिया शहा, डॉ.गौरव पारख हे मान्यवर उपस्थित होते.' कोणत्याही प्रकारची तंबाखू ही आरोग्याला घातकच आहे. तंबाखूतील निकोटीन व्यक्तीला व्यसनाधीन बनवते. २८ प्रकारचे कॅन्सरला कारणीभूत ठरणारे रासायनिक द्रव्ये तंबाखूत असतात. असंख्य कुटुंब तंबाखूच्या सेवनाने उध्वस्त झालेली आहेत. म्हणून व्यसनांपासून दूर रहावे तंबाखू सेवनाने जीभ, घसा, पोट, किडनी, अन्ननलिका, फुफ्फुसाचा कॅन्सर होतो तसेच हाडांची घनता कमी होते.

असोसिएशनच्या अध्यक्ष डॉ. वैशाली कोकरे म्हणाल्या की, गुटखा, मावा, सिगारेटस, यासारख्या व्यसनांच्या आहारी तरुण मुले जातात. सिगारेट्समध्ये जीवघेणे रासायनिक द्रव्ये असून ती मातीत नष्ट व्हायला २५ वर्षांचा कालावधी लागतो. म्हणून तंबाखूजन्य पदार्थांच्या आधीन जाऊ नये" असा सल्ला त्यांनी दिला. यावेळी आरोग्यशपथ विद्यार्थी व उपस्थितांनी घेतली.

आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर म्हणाले की, व्यसनांपासून दूर करण्याचे सभोवतालच्या व्यसनी लोकांना शहाणे करून सोडण्याचे काम आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी एक ब्रँड अँबेसिडर राजदूत बनून करणार आहेत. हेच खऱ्या अर्थाने शिक्षणाचे उद्दिष्ट ठरते. स्वागत व प्रास्ताविक विद्यार्थी विकास अधिकारी डॉ.भगवान माळी यांनी केले. प्रा. विवेक बळे व प्रा. क्रांतीलाल गायकवाड यांनी संयोजन व सूत्रसंचालन केले. तर डॉ. सीमा नाईक-गोसावी यांनी आभार मानले. १५० विद्यार्थ्यांना या मौलिक व्याख्यानाचा लाभ घेतला.

Tuljaram Chaturchand College
Library
Baramati

APS
5/12/21

साप्ताहिक रणशिंग पान नं.१५ दि.२५/७/२०१९

# तु.च.महाविद्यालयात सेवानिवृत्त सेवकांचा स्नेह मेळावा संपन्न

बारामती तालुकास्तर बॅडमिंटन स्पर्धा नुकतीच जिल्हा क्रीडा संकुल, बारामती या ठिकाणी संपन्न झाली. महाविद्यालयाच्या ओमराज व्होरा याने सिंगल इव्हेंट मध्ये सरळ दोन सेट जिंकले. ओमराज व्होरा, सुधांशु नलगे, यश देसाई व अभिषेक टेके यांनी सांघिक विजेतेपद प्राप्त केले. या संघातील सर्व खेळाडूंची पुणे जिल्हास्तर स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक प्रा. गौतम जाधव, प्रा.अशोक देवकर, प्रा.शोभा मांगले यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्व यशस्वी खेळाडूंचे संस्थेचे सचिव जवाहर शाह वाघोलीकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर, सर्व उपप्राचार्य, रजिस्ट्रार, शिक्षक, प्राध्यापक विद्यार्थी यांनी अभिनंदन केले आहे.

दैनिक प्रभात दि. ३/८/२०१८ पान नं. ५.

# ...तर पुणे विद्यापीठाला 'इन्स्टिट्यूशन्स ऑफ एमिनन्स' दर्जा

**प्रभात वृत्तसेवा**



**पुणे, दि. २ -** विद्यापीठ अनुदान आयोगाने देशातील १० सरकारी व १० खासगी विद्यापीठांना 'इन्स्टिट्यूशन्स ऑफ एमिनन्स' हा दर्जा देण्याची शिफारस केली आहे. त्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे अकरावे स्थान असून, एका क्रमांकाने विद्यापीठाची संधी हुकली आहे. मात्र, सध्या पहिल्या दहांमधील दोन विद्यापीठे हा दर्जा स्वीकारण्यास सहमत नसल्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे पुणे विद्यापीठाला 'इन्स्टिट्यूशन्स ऑफ एमिनन्स' हा दर्जा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

मनुष्यबळ विकास मंत्रालयाने प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थांना 'इन्स्टिट्यूशन्स ऑफ एमिनन्स' दर्जा देण्याची योजना आखली आहे. त्यांतर्गत माजी मुख्य निवडणूक आयुक्त एन. गोपालस्वामी यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या त्रिसदस्यीय तज्ज्ञ समितीने देशातील १५ सरकारी आणि १५ खासगी अशा एकूण ३० शैक्षणिक संस्थांची शिफारस हा दर्जा देण्यासाठी केली आहे. हा दर्जा मिळाल्यास केंद्राकडून एक हजार कोटी रुपये निधी मिळणार आहे.

या यादीत कोलकाता येथील जाधवपूर युनिव्हर्सिटी आठव्या क्रमांकावर, तमिळनाडूतील अण्णा युनिव्हर्सिटी नवव्या, तर बनारस हिंदू युनिव्हर्सिटी दहाव्या स्थानावर आहे. दरम्यान, यूजीसीने जाधवपूर आणि अण्णा विद्यापीठ यांचा शिफारशीसाठी विचार करण्यापूर्वी संबंधित राज्य सरकारांशी चर्चेची गरज असल्याचे म्हटले आहे. या दोन्ही विद्यापीठांना प्रत्येकी ५०० कोटी रुपयांचा खर्च उचलण्याची सहमती मिळाल्यानंतरच दर्जा मिळणार आहे.

मात्र, विद्यापीठ अनुदान आयोगाला अजूनपर्यंत या दोन्ही विद्यापीठांकडून हा दर्जा घेण्याबाबत कोणताच प्रतिसाद मिळाला नसल्याचे दिसून येत आहे. ही दोन्ही विद्यापीठे ह्या दर्जात सहभागी होणार नसल्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे पुणे विद्यापीठाला 'इन्स्टिट्यूशन्स ऑफ एमिनन्स' हा दर्जा मिळण्याची शक्यता बळावली आहे.

प्रभात दि-३/८/१८ पान-५

Tuljaram Chaturchand College Library Baramati

मा. प्राचार्य साहेब

साप्ताहिक रणशिंग दि. ५।९।१९ पान नं. 2

# तु. च. महाविद्यालयास सॉफ्टबॉल स्पर्धेत विजेतेपद

बारामती - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समिती आयोजित आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या खेळाडूंनी सॉफ्टबॉल स्पर्धेत विजेतेपद प्राप्त केले.

आंतर महाविद्यालयीन सॉफ्टबॉल स्पर्धा नुकतीच महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर संपन्न झाली. या स्पर्धेत अंतिम सामना साहेबराव शंकरराव ढमढेरे महाविद्यालयाबरोबर झाला. हा सामना महाविद्यालयाने १२-१ होमरनने जिंकून सांघिक विजेतेपद प्राप्त केले. या संघातील श्रीकांत सपकळ, सार्थक कटारिया, संदीप सावंत, संदेश काळे, सुर्यकांत मदने, चैतन्य पवार, ओंकार भोंग, या खेळाडूंची आंतर विभागीय स्पर्धेसाठी निवड झालेली आहे.

या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक प्रा. गौतम जाधव, प्रा. अशोक देवकर व प्रा. शोभा मांगले यांचे मार्गदर्शन लाभले.

या सर्व यशस्वी खेळाडूंचे संस्थेचे सचिव जवाहर शाह वाघोलीकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, सर्व उपप्राचार्य, रजिस्ट्रार, शिक्षक, प्राध्यापक विद्यार्थी यांनी अभिनंदन केले आहे.

दैनिक पुढारी दि. ४।९।२०१९ पान नं. ५

## तु. च. महाविद्यालय सॉफ्टबॉल स्पर्धेत विजयी

**बारामती :** बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाने आंतरमहाविद्यालयीन सॉफ्टबॉल स्पर्धेत विजेतेपद प्राप्त केले आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समिती यांच्या वतीने आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेचे आयोजन केले आहे. यातील सॉफ्टबॉल स्पर्धा महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर पार पडली. स्पर्धेतील अंतिम सामना साहेबराव शंकरराव ढमढेरे महाविद्यालयाबरोबर झाला. हा सामना महाविद्यालयाने १२-०१ होम रनने जिंकून सांघिक विजेतेपद प्राप्त केले.

या संघातील श्रीकांत सपकळ, सार्थक कटारिया, संदीप सावंत, संदेश काळे, सूर्यकांत मदने, चैतन्य पवार, ओंकार भोंग या खेळाडूंची आंतरविभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक प्रा. गौतम जाधव, प्रा. अशोक देवकर व प्रा. शोभा मांगले यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्व यशस्वी खेळाडूंचे संस्थेचे सचिव जवाहर शाह वाघोलीकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, उपप्राचार्य, रजिस्ट्रार, प्राध्यापक, विद्यार्थी यांनी अभिनंदन केले. पुढारी दि. ४।९।१९ पान नं. ५

दैनिक पुढारी दि. ३।९।२०१९ पान नं. ५.

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
## पदवीप्रदान समारंभ २०१९
### निवेदन

डिसेंबर, २०१९ किंवा जानेवारी, २०२० मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या ११६ व्या पदवीप्रदान समारंभासाठी पदवी / पदविका प्रमाणपत्र प्राप्त करू इच्छिणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांकडून विहित नमुन्यात ऑनलाईन पद्धतीने (Online mode) अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्जाचा नमुना, शुल्क इत्यादीबाबतची सविस्तर माहिती विद्यापीठाच्या **convocation.unipune.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदरची मुदत खालीलप्रमाणे आहे.

**दि. ०३ सप्टेंबर, २०१९ ते ०३ ऑक्टोबर, २०१९ पर्यंत (नियमित शुल्कासह)**
**दि. ०४ ऑक्टोबर, २०१९ ते १८ ऑक्टोबर २०१९ पर्यंत (विलंब शुल्कासह)**

पदवी/पदविका प्रमाणपत्र मिळण्याकरिता विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने अर्ज योग्य शुल्कासह भरल्यानंतर अंतिम वर्षाच्या **गुणपत्रिकेची छायांकित प्रत Upload करणे अनिवार्य आहे.**

**महत्त्वाची सूचना :**

१. पदवी स्तरावरील प्रमाणपत्रे संबंधित महाविद्यालयात समारंभपूर्वक वितरीत करण्यात येतील.
२. पदव्युत्तर स्तरावरील प्रमाणपत्रे पदवीप्रदान समारंभादिवशी विद्यापीठात वितरीत करण्यात येतील.
३. बहि:स्थ विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे पोस्टाने पाठविण्यात येतील.
४. पदवीप्रदान सोहळा संपन्न होण्यापूर्वी पंधरा दिवस अगोदर "Supplementary Convocation Degree Certificate" ही लिंक बंद राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

जाहिरात क्र. ४८
दिनांक : ०३/०९/२०१९.

**डॉ. प्रफुल्ल पवार**
**कुलसचिव**

पुढारी दि. ३।९।१९ पान नं. ५

Tuljaram Chaturchand College Library Baramati

सकाळ शनिवार, ७ सप्टेंबर २०१९ ७

# टीसी कॉलेजमध्ये २० रोजी वादविवाद, वक्तृत्व स्पर्धा

**बारामती शहर, ता. ६ :** कविवर्य मोरोपंत आंतरमहाविद्यालयीन वादविवाद व वक्तृत्व स्पर्धा २० व २१ सप्टेंबर रोजी होणार आहेत. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय आणि बारामती नगर परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने स्पर्धेचे आयोजन केले आहे.

कविवर्य मोरोपंत आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व आणि वादविवाद स्पर्धेचे उद्घाटन उपविभागीय पोलिस अधिकारी नारायण शिरगावकर यांच्या हस्ते होणार आहे. अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे सचिव जवाहर (वाघोलीकर) प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असल्याची माहिती टीसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी दिली आहे.

या स्पर्धेच्या पहिल्या दिवशी कनिष्ठ महाविद्यालय आणि वरिष्ठ महाविद्यालय गटामध्ये वक्तृत्व स्पर्धा होणार आहेत. दुसऱ्या दिवशी वादविवाद आणि उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धा घेण्यात येणार आहेत. यंदा कनिष्ठ महाविद्यालयासाठी मोरोपंतांच्या केकावलीतील मोठेपण, जैन धर्माचा भारतातील प्रसार, राजर्षी शाहू महाराजांचे द्रष्टेपण, काश्मीरची नवी पहाट?, 'आर्थिक मंदी कोणाची चांदी' हे विषय असून, वरिष्ठ महाविद्यालयासाठी मोरोपंतांच्या काव्यातील विचारसौंदर्य, लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी... भारतीय स्वातंत्र्याची बलस्थाने, आपत्तींचा महापूर आणि आपण, भारताची जागतिक मुत्सद्देगिरी असे विविध विषय आहेत. तर वादविवादासाठी 'आजचा समाज भीती, भक्ती, नि आभासावर उभा आहे' असा विषय आहे. स्पर्धेत भाग घेण्यासाठी व अधिक माहितीसाठी डॉ. रंजना नेमाडे यांच्या मो.९७६४२९६००३ वर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

दैनिक प्रभात दि. ६/९/२०१९ पान नं. ५

# शासकीय, निमशासकीय कर्मचाऱ्यांनी उपसले संपाचे हत्यार

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. ५ - राज्यातील ग्रामसेवकानंतर राज्य शासकीय निमशासकीय कर्मचारी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी संघटनांनी देखील त्यांच्या विविध मागण्यांसाठी संपाचे हत्यार काढले आहे. गुरुवारी (दि. ५) काळ्या फित लावून या संघटनेने निषेध नोंदविला असून ९ सप्टेंबरला एक दिवशीय संप करण्यात येणार आहे. या दरम्यान, राज्य शासनाकडून संघटनेच्या मागण्या मान्य झाल्या नाही तर ११ सप्टेंबरपासून बेमुदत संपाचा इशारा संघटनेकडून निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

मागील दोन आठवड्यांपासून राज्यातील ग्रामसेवकांचे कामबंद आंदोलन सुरू असून अद्याप त्यावर तोडगा निघालेला नाही. तसेच पुणे जिल्ह्यातील संगणक ऑपरेटरही संपावर आहेत. त्यामुळे पुणे जिल्ह्यातील गावपातळीवर कामकाज ठप्प आहे. आता शासकीय निमशासकीय कर्मचारी आणि शिक्षकांनीही संपाचा इशारा दिला असून आज जिल्हा परिषदेतील कर्मचाऱ्यांनी कार्यालयाच्या गेटसमोर आंदोलन केले. तसेच पुढील तीन दिवस काळ्या फित लावून राज्य शासनाचा निषेध करण्यात येणार आहे. जुनी पेन्शन योजना लागू करणे, वेतन त्रुटी दूर कराव्या, खासगीकरण आणि कंत्राटीकरण धोरण रद्द करून कार्यालयातील कार्यरत सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम करावे, या मागण्या आहेत.

प्रभात दि-६/९/१९-पान-५

Chaturchand College Baramati

मा. प्राचार्य साहेब

६ पुढारी MY पुणे जिल्हा शुक्रवार, ६ सप्टेंबर २०१९

# तु. च. महाविद्यालयाचे घवघवीत यश

## तालुकास्तरीय कुस्ती, कराटे, बॅडमिंटन स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी

**बारामती : प्रतिनिधी**

बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाने कुस्ती, कराटे, बॅडमिंटन स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. क्रीडा व युवक सेवासंचालनालय महाराष्ट्र राज्य व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय पुणे यांच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन केले होते.

बारामती तालुकास्तर कुस्ती स्पर्धा नुकतीच जिल्हा क्रीडासंकुल बारामती या ठिकाणी पार पडली. यात शालेय १७ व १९ वर्षे वयोगटात मुलांच्या संघात मल्लांनी उल्लेखनीय यश संपादन केले. स्पर्धेत अथर्व ठोंबरे, वैष्णव शिंदे, यश देशमाने, रोहन जाधव या खेळाडूंनी फ्री स्टाईल कुस्ती स्पर्धेत आपापल्या वजन गटात प्रथम क्रमांक पटकाविला.

शुभम शिंदे या खेळाडूने ग्रीकोरोमन कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला. बारामती तालुकास्तर कराटे स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुल, बारामती या ठिकाणी झाली. यात सुदर्शन सपकळ, हर्षद सांगडे, करिश्मा भोसले, श्रावणी तावरे या खेळाडूंनी आपापल्या वजन गटात प्रथम क्रमांक मिळविला.

बारामती तालुकास्तर बॅडमिंटन स्पर्धा नुकतीच जिल्हा क्रीडासंकुल, बारामती या ठिकाणी पार पडली. महाविद्यालयाच्या ओमराज व्होरा याने सिंगल इव्हेंटमध्ये सरळ दोन सेट जिंकले. ओमराज व्होरा, सुधांशू नलगे, यश देसाई व अभिषेक टेके यांनी सांघिक विजेतेपद प्राप्त केले.

या संघातील सर्व खेळाडूंची पुणे जिल्हास्तर स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक प्रा. गौतम जाधव, प्रा. अशोक देवकर, प्रा. शोभा मांगले यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्व यशस्वी खेळाडूंचे संस्थेचे सचिव जवाहर शाह वाघोलीकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, सर्व उपप्राचार्य, रजिस्ट्रार, शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी यांनी अभिनंदन केले.

पुढारी-दि-६।९।१९-पान-६

४ पुढारी MY पुणे जिल्हा पुणे, शुक्रवार, ६ सप्टेंबर २०१९

# बारामतीत दि. २० पासून वादविवाद, वक्तृत्व स्पर्धा

**बारामती : प्रतिनिधी**

येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात दि. २० व २१ सप्टेंबर रोजी कविवर्य मोरोपंत आंतरमहाविद्यालयीन वादविवाद व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेचे हे ४७ वे वर्ष आहे.

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय आणि बारामती नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा आयोजित केली जाते. या स्पर्धेचे उद्घाटन दि. २० रोजी उपविभागीय पोलिस अधिकारी नारायण शिरगावकर यांच्या हस्ते होणार आहे. अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे सचिव जवाहर वाघोलीकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असल्याची माहिती तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी दिली आहे.

बारामती नगरपरिषदेच्या पुढाकाराने १९७२-७३ मध्ये ही स्पर्धा सुरू करण्यात आली. कविवर्य मोरोपंतांचे स्मरण व्हावे हा उद्देश स्पर्धा भरवण्यामागे आहे. दोन दिवस चालणाऱ्या या स्पर्धेच्या पहिल्या दिवशी कनिष्ठ महाविद्यालय आणि वरिष्ठ महाविद्यालय गटामध्ये वक्तृत्व स्पर्धा होणार आहेत. दुसऱ्या दिवशी वादविवाद आणि उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धा घेण्यात येणार आहेत. यंदा कनिष्ठ महाविद्यालयासाठी मोरोपंतांच्या केकावलीतील मोठेपण, जैन धर्माचा भारतातील प्रसार, राजर्षी शाहू महाराजांचे द्रष्टेपण, काश्मिरची नवी पहाट ?, आम्हाला विनोदाचे वावडे आहे, आर्थिक मंदी कोणाची चांदी हे विषय देण्यात आले आहेत.

वरिष्ठ महाविद्यालयासाठी मोरोपंतांच्या काव्यातील विचारसौंदर्य, भारतीय संस्कृती व जैन वाङ्मय, लोकमान्य टिळक नि महात्मा गांधी भारतीय स्वातंत्र्याची बलस्थाने, लोकशाहीर अण्णाभाऊ यांचा जीवनसंघर्ष, आपत्तींचा महापूर आणि आपण, भारताची जागतिक मुत्सद्देगिरी, मनोरंजनाचे नवे वळण : वेबसिरीज असे विषय ठेवण्यात आले आहेत. वादविवादासाठी 'आजचा समाज भीती, भक्ती, नि आभासावर उभा आहे' असा आहे. कविवर्य मोरोपंत आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व आणि वादविवाद स्पर्धेचे पारितोषिक वितरण माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील यांच्या हस्ते होणार आहे. सहभागी स्पर्धकांनी डॉ. रंजना नेमाडे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पुढारी-दि-६।९।१९-पान-४

Tuljaram Chaturchand College Library Baramati

मा. प्राचार्य साहेब

दै. पुढारी दि. २०/९/१९ पान ५

# टी. सी. महाविद्यालयात कार्यशाळा

बारामती : प्रतिनिधी

येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात, वाणिज्य विभाग व कंझ्युमर गाईडन्स सोसायटी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १६ व दि. १७ सप्टेंबर रोजी 'ग्राहक जागरूकता व वित्तीय शिक्षण' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी एक दिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचा वाणिज्य विभागातील ३७३ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

कंझ्युमर गाईडन्स सोसायटीचे सदस्य प्रफुल्ल पवार यावेळी म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपली गुंतवणूक नोकरी लागल्यापासूनच केली पाहिजे. त्याचा त्यांना भविष्यात उत्तम फायदा होऊ शकतो, यासाठी त्यांनी वॉरेन बफे याचे उदाहरण दिले. जर व्यक्तीने आपल्या उत्पन्नाच्या ३० टक्के रक्कम गुंतवणूक केल्यास त्याचे जीवन सुखकर होईल. तसेच, त्यांनी विविध गुंतवणुकीच्या मार्गांची माहिती दिली.

मनोज पवार म्हणाले की, ग्राहकांची होणारी फसवणूक टाळण्यासाठी तक्रारी पुराव्यासहीत सादर केल्या पाहिजे. पुरावा खरा असणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्व यंत्रणेचा वेळ व पैसा वाया जाणार नाही. या वेळी ग्राहकांची फसवणूक, तक्रार निवारण यंत्रणा, न्याय-निवाडे इत्यादींची माहिती फिल्मच्या सहाय्याने देण्यात आली.

या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. विवेक बळे यांनी केले. प्रा. सागर हिवरकर यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. यावेळी वाणिज्य विभागातील प्रा. के. आर. पगारे, डॉ. जे. के. पवार, डॉ. एन. आर. शहा, प्रा. माधुरी पुंज, प्रा. पूजा व्होरा, प्रा. एम. बी. भोसले, प्रा. एस. आर. दोशी, प्रा. एस. पी. पवार, प्रा. एस. जी. गोरे इत्यादी प्राध्यापक उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर आणि वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. एम. आर. साळवे यांचे सहकार्य

दै. लोकमत दि. २३/९/१९ पान ३

# शिक्षक, शिक्षकेतरांची सुधारित वेतननिश्चिती पूर्ण करण्याचे आदेश

**प्रतिनिधी, पुणे**

**सुधारित वेतन** संरचनेनुसार राज्यातील माध्यमिक शाळांतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची वेतननिश्चिती करण्याचे आदेश माध्यमिक शिक्षण संचालनालयाने दिले आहेत. अद्याप वेतननिश्चितीच झाली नसल्याने पुढील कार्यवाही रखडली आहे.

राज्यातील माध्यमिक शाळांतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाचा लाभ देण्यासाठी सुधारित वेतननिश्चिती करण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र, राज्यातील बहुतांश माध्यमिक शाळांनी सुधारित वेतननिश्चिती करण्यात आली नसल्याची तक्रार शिक्षक संघटनांकडून शासनाकडे करण्यात आली होती.

या पार्श्वभूमीवर विभागीय शिक्षण उपसंचालक, जिल्हा परिषदांच्या माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांना सुधारित वेतन संरचनेनुसार तातडीने वेतननिश्चिती करण्याचे आदेश संचालक दिनकर पाटील यांनी दिले आहेत. तसेच या संदर्भातील अहवाल पाठवण्यास सांगण्यात आले आहे.

Tuljaram Chaturchand College
Library
Baramati

मा. प्राचार्य साहेब

दैनिक सकाळ दि. २५/५/२०१९. पान नं. ४ (पुणे शहर)

# 'टीसी'च्या विद्यार्थ्यांचा बारामतीत रंगला मेळावा

**बारामती शहर, ता. २४** : येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील १९९०-९१ या वर्षातील माजी विद्यार्थ्यांचा मेळावा बारामतीत झाला. तब्बल २८ वर्षांनी एकत्र आलेल्या विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला.

परराज्यातूनही खास या मेळाव्यासाठी माजी विद्यार्थी आले होते. यावेळी ७५ माजी विद्यार्थी उपस्थित होते. महाविद्यालयीन आठवणींना उजाळा देत प्रत्येकाने परिचय करून दिला. मेळाव्यासाठी अबिद शेख, शंकर गायकवाड, अरुण गायकवाड, प्रशांत साळुंखे, तानाजी निंबाळकर, शरद पवार आदींनी परिश्रम घेतले.



बारामती : स्नेहमेळाव्याप्रसंगी उपस्थित असलेले टीसी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी.

Tuljaram Chaturchand College Library Baramati

[5519] Ext. - 710

साप्ताहिक कऱ्हा वार्ता Weekly Karhawarta शनिवार दि.२१ सप्टेंब

# तु.च. महाविद्यालयात ग्राहक जागरूकतेवर कार्यशाळा संपन्न

**बारामती:-** येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, वाणिज्य विभाग व कंझ्युमर गाईडन्स सोसायटी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने १६ व १७ सप्टेंबर रोजी ग्राहक जागरूकता व वित्तीय शिक्षण या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचा वाणिज्य विभागातील ३७३ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

कंझ्युमर गाईडन्स सोसायटीचे सदस्य प्रफुल्ल पवार यावेळी म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपली गुंतवणूक नोकरी लागल्या पासूनच केली पाहिजे. त्याचा त्यांना भविष्यात उत्तम फायदा होऊ शकतो, यासाठी त्यांनी वॉरेन बफे याचे उदाहरण दिले. जर व्यक्तीने आपल्या उत्पन्नाच्या ३० टक्के रक्कम गुंतवणूक केल्यास त्याचे जीवन सुखकर होईल. तसेच त्यांनी विविध गुंतवणुकीच्या मार्गांची माहिती दिली.

मनोज पवार म्हणाले की, ग्राहकांची होणारी फसवणूक टाळण्यासाठी तक्रारी पुराव्यासहित सादर केल्या पाहिजे. पुरावा खरा असणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्व यंत्रणेचा वेळ व पैसा वाया जाणार नाही. यावेळी ग्राहकांची फसवणूक, तक्रार निवारण यंत्रणा, न्यायनिवाडे इत्यादींची माहिती फिलमच्या सहाय्याने देण्यात आली.

या कार्यक्रमाचे आयोजन प्रा.विवेक बळे यांनी केले. प्रा.सागर हिवरकर यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. यावेळी वाणिज्य विभागातील प्रा.के.आर.पगारे, डॉ.जे.के.पवार, डॉ.एन.आर.शहा, प्रा.माधुरी पुंज, प्रा.पूजा व्होरा, प्रा.एन.बी.भोसले, प्रा.एस.आर.दोशी, प्रा.एस.पी.पवार, प्रा.एस.जी.गार इत्यादी प्राध्यापक उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्राचार्य डॉ. [illegible] आणि वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. एन.आर. [illegible] सहकार्य लाभले.

Tuljaram Chaturchand College Library Baramati
Tuljaram Chaturchand College Baramati

मा. प्राचार्य साहेब

साप्ताहिक रणशिंग — दि. २६/९/२०१९, पान नं. ७

# दि. ४ पासून अनेकान्तमध्ये मॅनेजमेंट स्टडीजच्या ८ व्या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

बारामती - अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या अनेकान्त इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज्मध्ये सालाबादप्रमाणे ८ व्या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन दि. ४ व ५ ऑक्टोंबर २०१९ रोजी करण्यात आले आहे.

बारामती पंचक्रोशीतील व्यवस्थापन शाखेतील शिक्षणाची सर्वोत्कृष्ट गुणवत्ता जोपासणाऱ्या एआयएमएस संस्थेला NAAC-Banglore, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचे Permanent Affiliation आणि ISO by JAS-ANZ, New Zealand आणि Australia यांनी मानांकन देवून संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. बारामती व परिसरातील विद्यार्थ्यांच्या व प्राध्यापकांच्या संशोधनास वाव देण्यासाठी व त्यांच्यासाठी वक्तृत्व, व्यक्तिमत्व विकास, सभाधीटपणा, संभाषण कौशल्य इ.ची जोपासना करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. या परिषदेचा उद्घाटन समारंभ दि. ४ ऑक्टोंबर रोजी सकाळी १० वा. मा.डॉ.पी.एस. अहिथाळ, कुलगुरू, श्रीनिवास विद्यापीठ, मॅंगलोर व प्रा.डॉ. प्रभा किरण, ख्रिस्ट अभिमत विद्यापीठ, बेंगलुरू तसेच संस्थेचे अध्यक्ष श्री. अरहंतदास शहा (सराफ), अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे सचिव श्री. जवाहर शाह (वाघोलीकर), तसेच अनेकान्त इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज्चे सचिव श्री. मिलींद शाह (वाघोलीकर) यांच्या उपस्थितीत होणार आहे. तरी या परिषदेमध्ये जास्तीत जास्त संशोधक विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन संस्थेचे संचालक डॉ. एम. ए. लाहोरी यांनी केले आहे.

Tuljaram Chaturchand College Library Baramati

A135
(२६/९)

मा. प्राचार्य साहेब

दैनिक पुढारी दि. २९/१/२०१९ पान नं. ५.

# टी. सी. महाविद्यालय विज्ञान प्रदर्शनात प्रथम



विज्ञान प्रदर्शनातील प्रथम क्रमांक पटकाविणाऱ्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना मान्यवर.

**बारामती : प्रतिनिधी**

औरंगाबाद येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक मिळविला आहे. बारावी विज्ञान शाखेच्या इलेक्ट्रॉनिक्स विषयाच्या रोहित संजय सकुंडे आणि विनय हनुमंत खलाटे या विद्यार्थ्यांनी 'ठेलज्ञशी इसळश चशलहरपळी चरीी ठेींशी' या विषयाच्या मॉडेलचे सादरीकरण केले होते. या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये या मॉडेलला प्रथम क्रमांक मिळाला आहे. यासाठी विद्यार्थ्यांना पाच हजार रुपये रोख रक्कम, चषक व प्रशस्तिपत्रक बहाल करण्यात आले आहे. इलेक्ट्रॉनिक्स विषयाच्या मुग्धा टांकसाळे यांचे या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. या स्पर्धेसाठी प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांना प्रदर्शनात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले. याबरोबरच विद्यार्थ्यांना महाविद्यालयाकडून प्रोत्साहनपर पाच हजार रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले. उपप्राचार्या वैशाली माळी, समन्वयक गोरखनाथ मोरे, राजेंद्र आगवणे, विभागप्रमुख श्रीरंग शेळके यांचे विद्यार्थ्यांना या कामी सहकार्य लाभले.

पुढारी २९/१/१९ पान ५

Tuljaram Chaturchand College Library * Baramati *

मा. प्राचार्य साहेब

→ → →

दैनिक लोकमत दि. 3/9/2019 पान नं. 3

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या आवारात पोलीस चौकी

लोकमत न्यूज नेटवर्क

बारामती : बारामती शहरातील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या आवारात पोलीस चौकी उभारण्यात येणार आहे, अशी माहिती पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांनी दिली.



बारामती शहरातील संवेदनशील ठिकाणी पोलिसांची गस्त वाढावी या दृष्टीने ही पोलिस चौकी उभारण्याचा निर्णय घेतल्याचे पाटील यांनी सांगितले. मुलींची छेडछाड होऊ नये या उद्देशासह या भागात पोलिसांची उपस्थिती असावी, चोरीच्या घटना घडू नये, या साठी ही चौकी उभारली जाणार आहे.

महाविद्यालयाच्या सायकल स्टँड परिसरात ही चौकी उभारणार आहे. चौकीचा फायदा महाविद्यालयासह आसपासच्या परिसरालाही होणार आहे. चौकीत बीट मार्शलचे पोलीस कर्मचारी ड्युटीस थांबणार आहेत, अशी माहिती देखील पाटील यांनी दिली. लोकमत 3/9/19 3

[5536]-403

दैनिक पुढारी दि. 3/10/2019 पान नं. 4.

# निवडणूक कामातून अत्यावश्यक सेवा वगळा

## कामकाजावर परिणाम होत असल्याने विद्यापीठ प्रशासनाचे जिल्हा प्रशासनाला पत्र

पुणे : प्रतिनिधी

[5502]-

विधानसभा निवडणुकीसाठी जिल्हा प्रशासनाने विद्यापीठातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना निवडणूक कामासाठी नियुक्त केले आहे. त्यामुळे विद्यापीठातील ५०० ते ६०० कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणासाठी विद्यापीठाबाहेर जावे लागणार आहे. परिणामी विद्यापीठाचे कामकाज ठप्प होण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर अत्यावश्यक सेवेसाठी काम करणाऱ्या व्यक्तींना निवडणूक कामातून सवलत मिळावी, असे पत्र विद्यापीठाने जिल्हा प्रशासनाला दिले आहे.

> “ विधानसभा निवडणुका दर पाच वर्षांनी येत असतात. यामध्ये शासकीय कर्मचाऱ्यांचा सहभाग असतोच. त्यामुळे विद्यापीठातील ५०० ते ६०० कर्मचारी निवडणूक कामासाठी नियुक्त करण्यात आले आहेत. यामध्ये फक्त अत्यावश्यक सेवेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना निवडणूक कामातून सवलत मिळावी, अशी मागणी जिल्हा प्रशासनाकडे केली होती. ती त्यांनी मंजूर केली आहे.
>
> - **डॉ. प्रफुल्ल पवार**, कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

लोकशाही भक्कम करण्यासाठी सर्व शासकीय कर्मचाऱ्यांनी निवडणुकांच्या कामात आपला सहभाग नोंदविला पाहिजे. ही बाब खरी असली, तरी विद्यापीठासारखी संस्था चालविण्यासाठी काही कर्मचारी विद्यापीठात असणे आवश्यक आहे. अन्यथा विद्यापीठाचे कामकाज करणे अवघड जाणार आहे. आरोग्य विभाग, पाणीपुरवठा करण्यासाठी नियुक्त असलेल्या कर्मचाऱ्यांना कामातून वगळावे, असा पत्रव्यवहार विद्यापीठाने केला. मात्र, त्यातील अत्यावश्यक सेवा देणाऱ्या काही कर्मचाऱ्यांना वगळण्यात आले आहे. विद्यापीठातर्फे तीन जिल्ह्यांतील संलग्न महाविद्यालयांची परीक्षा घेतली जाते. मात्र, प्राध्यापक अनेक विभागाचे प्रमुख, उपकुलसचिव, कक्ष अधिकारी यांनाही निवडणुकीच्या कामास नियुक्त करण्यात आले आहे. त्यामुळे प्रशिक्षणासाठी अर्धा दिवस विद्यापीठाबाहेर जावे लागते. याचा विद्यापीठाच्या कामकाजावर परिणाम होत असल्याची तक्रार विद्यापीठातील कर्मचाऱ्यांनी केली आहे. पुढारी 3/10/19 4

Tuljaram Chaturchand College
Library
Baramati

सा. रणारिंग. दि-१०/१०/२०१९. पा.नं-११.

# तु.च.महाविद्यालयामध्ये क्लाऊड मॅनेजमेंट कार्यशाळा संपन्न

बारामती: तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या संगणक शास्त्र विभागाने ICT Academy व सेल्सफोर्स यांच्या सहाय्याने एम.एससी. संगणक शास्त्रांच्या विद्यार्थ्यांसाठी Salesforce ADX - २०१ या सहा दिवसीय क्लाऊड मॅनेजमेंट कार्यशाळेचे आयोजन केले आहे. ही कार्यशाळा दिनांक ३० सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर २०१९ दरम्यान आयोजित केली होती. या कार्यशाळेमध्ये विद्यार्थी Business Administration Specialist, Security Specialist, Lightning Experience Reports & Dashboards Specialist या सेल्सफोर्स च्या सुपरबॅज चे प्रात्यक्षिक घेत आहेत.

या कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुरूमकर यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलताना ते म्हणाले की, क्लाऊड मॅनेजमेंट हे भविष्यात विद्यार्थ्यांना रोजगाराच्या अनेक संधी निर्माण करून देणारे आहे. विद्यार्थ्यांनी आपले करिअर घडवताना केवळ सध्याच्या संधीकडे न पाहता, भविष्यात काय संधी निर्माण होतील याचा दूरदृष्टीने विचार केला पाहिजे.

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय हे अश्या प्रकारची कार्यशाळा घेणारे महाराष्ट्रातील पहिलेच महाविद्यालय आहे. सेल्सफोर्स अश्या प्रकारच्या कार्यशाळा भारतामधील निवडक अशा केवळ ५० महाविद्यालयां मध्येच घेणार आहे. सेल्सफोर्स ही जगातील सर्वात मोठी क्लाऊड आधारित सी.आर.एम. कंपनी आहे. या कंपनीमुळे २०२२ पर्यंत भारतामध्ये अंदाजे १० लाख रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होणार आहेत. या कार्यशाळेमध्ये प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना Salesforce Developer, Salesforce Administrator, Salesforce Architect, Salesforce Consultant, Salesforce Project Mana[illegible], Salesforce Business A..alyst, अश्या प्रकारच्या संधी IT कंपनी मध्ये सहज मिळू शकतात, अशी माहिती संगणक शास्त्र विभागातील प्रा. राहुल शहा यांनी दिली.

उद्घाटनाच्या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून ICT Academy तर्फे प्रवीण जैन, महाराष्ट्र राज्य प्रमुख, विरा बास्करन, वरिष्ठ संबंध व्यवस्थापक व क्रांती कुमार, ट्रेनर, संगणक शास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा. उपेंद्र चौधरी, प्रा. राहुल शहा आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यशाळेच्या आयोजनासाठी समन्वयक म्हणून प्रा. राहुल शहा यांनी विशेष प्रयत्न केले. तसेच कार्यशाळा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी विभाग प्रमुख प्रा. उपेंद्र चौधरी व विभागाचे इतर सर्व प्राध्यापकांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. लोंढे व प्रा. गविमठ यांनी केले.

# एआयएमएस आयोजित राष्ट्रीय परिषद संपन्न



बारामती -येथील अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे अनेकांत इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दि.४ व ५ ऑक्टोंबर रोजी राष्ट्रीय परिषद संपन्न झाली.

'Higher Eduoation Metamorphosis, Quest for Quality' या विषयावरील चर्चासत्रासाठी प्रमुख पाहुणे डॉ.पी.एस. अयथाळ, व्हाईस चान्सलर, श्रीनिवास युनिव्हरसिटी मंगलोर, कर्नाटक विशेष आमंत्रित डॉ. प्रभा किरण, असिस्टंट प्रोफेसर, इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ख्रिस्ट युनिव्हरसिटी, बेंगलुरू इ. उपस्थित होते. अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मा.श्री. अरहतदास शहा (सराफ) हे सदर परिषदेचे अध्यक्ष होते. तसेच श्री. जवाहर शहा (वाघोलीकर), सचिव अनेकांत एज्युकेशन सोसायटी, बारामती, अनेकांत इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजचे सचिव श्री. मिलिंद राजकुमार शहा (वाघोलीकर), श्री. सोनिक शहा (पंदारकर) सदस्य गव्हर्निंग कौन्सिल एआयएमएस, गव्हर्निंग कौन्सिलचे सर्व सदस्य, श्री. चंद्रशेखर मुरूमकर प्राचार्य टी.सी. कॉलेज बारामती, श्री. विद्याधर महामुनी, ओ.एस. अनेकान्त एर्ज्युकेशन सोसायटी, बारामती संस्थेचे संचालक डॉ. एम.ए. लाहोरी व परिषदेचे समन्वयक डॉ. तानाजी चव्हाण आणि एआयएमएसचे प्राध्यापकवृंद उपस्थित होते. या परिषदेस देश व विदेशातील प्राध्यापक संशोधक उद्योग तज्ञ व विद्यार्थी सहभागी झाले होते.

परिषदेतील उल्लेखनीय बाब अशी होती की ६६ शोधलेख प्राप्त झाले. यासाठीचे बनविलेल्या रिसर्च जर्नलचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले. डॉ.पी.एस. अयथाळ, याप्रसंगी जागतिक दर्जाची संस्था निर्माण करण्यासाठी आवश्यक गोष्टी विषयी आपले मत व्यक्त केले.

श्री. अरहतदास शहा (सराफ) यांचे अध्यक्षीय भाषण झाले.

याप्रसंगी डॉ.एम.ए. लाहोरी यांनी आपले विचार मांडले.

परिषदेत पॅनेल चर्चासत्राचे सूत्रसंचालन डॉ.यु.एस. कोळ्ळीमठ यांनी केले.

विद्यार्थी गटामध्ये श्री. साकीब इब्राहिम खान, इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ख्रिस्ट डिमड युनिव्हरसिटी बेंगलुरू प्राध्यापक गटामध्ये डॉ. मुरारी शर्मा आयबीएमआरडी, अहमदनगर तसेच संशोधन विद्यार्थी गटामध्ये श्री. उपेंद्र शुक्ला संशोधक विद्यार्थी नेवल वाडीया इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज ॲन्ड रिसर्च, तसेच उद्योजक गटामध्ये भुपेन्द्र टोपे एआरएआय, पुणे यांना उल्लेखनीय शोधलेख प्रस्तुती प्रदान करण्यात आले.

सदर परिषदेचा एक भाग म्हणजेच आंतरमहाविद्यालयीन SIP CONVEX स्पर्धा यामध्ये अमतुल्ला बारामतीवाला प्रथम पारितोषिक, राहुल सोळंकी द्वितीय पारितोषिक व हरीषचंद्र चौगुले तृतीय पारितोषिक मान्यवरांच्या हस्ते देण्यांत आले.

निरोप समारंभाचे अध्यक्ष डॉ. राजकुमार छाजेड, सदस्य अनेकांत एज्युकेशन सोसायटी, बारामती व प्रमुख पाहुणे म्हणून श्री. धनंजय जामदार अध्यक्ष बीआयएमए, बारामती हे उपस्थित होते. परिषदेचा सारांश प्रा. प्रविण यादव व आभार प्रदर्शन डॉ. दत्तात्रय मोरे यांनी केले.

• मा.प्राचार्य साहेब •

सा. लोकवार्ता. दि- १०/१०/२०१९. पा. नं-३.

# तु.च. महाविद्यालयाचा ६ महाविद्यालयांशी करार



बारामती:- विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) परामर्श योजनेसाठी तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाची मेंटॉर कॉलेज म्हणून निवड केली. या अंतर्गत महाविद्यालयाने सहा अन्य महाविद्यालयांशी करार केला.

जिल्ह्यातील वसंतराव फराटे पाटील आर्ट्स, कॉमर्स व सायन्स कॉलेज, भवानीनगर, सोमेश्वर सायन्स कॉलेज, शिवनगर विद्या प्रसारक मंडळाचे कॉमर्स, सायन्स आणि कॉम्प्युटर एज्युकेशन, माळेगाव, जिजामाता महाविद्यालय सराटी, रत्नप्रभादेवी पाटील महिला महाविद्यालय बावडा या महाविद्यालयांशी हा शैक्षणिक करार करण्यात आला आहे.

या सर्व महाविद्यालयांना तु.च. महाविद्यालय नॅक मूल्यांकनासाठी आवश्यक बाबींसंदर्भात मार्गदर्शन करणार आहे. प्रामुख्याने प्राध्यापक व कर्मचारी यांना द्यावयाचे योग्य प्रशिक्षण, नॅककरिता आवश्यक ती कागदपत्रे तयार करणे व सादरीकरण करणे, विविध उपक्रम, संशोधन इत्यादी बाबींमध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने प्रोत्साहन देणे यासाठी महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. यावेळी तु.च. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर, डॉ.अविनाश जगताप, सहा महाविद्यालयांचे प्राचार्य व आयक्यूएसी समन्वयक उपस्थित होते.

[5502]-1001

सा. रणशिंग. दि-१०/१०/२०१९. पा. नं-१४.

# युजीसी 'परामर्श' स्कीम अंतर्गत शैक्षणिक करार

बारामती-यु.जी.सी. नवी दिल्लीने NAAC Accreditation करून घेणेकामी तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाची नुकतीच परामर्श स्कीम साठी मेंटॉर कॉलेज म्हणून निवड केली. या अंतर्गत टी सी महाविद्यालयाने पुणे जिल्ह्यातील वसंतराव फराटे पाटील आर्ट्स, कॉमर्स व सायन्स कॉलेज, भवानीनगर, सोमेश्वर सायन्स कॉलेज, शिवनगर विद्या प्रसारक मंडळाचे कॉमर्स, सायन्स आणि कॉम्प्युटर एज्युकेशन, माळेगाव, जिजामाता महाविद्यालय, सराटी, रत्नप्रभादेवी पाटील महिला महाविद्यालय, बावडा या महाविद्यालयांशी शैक्षणिक करार केला आहे. या सर्व महाविद्यालयांना करीता NAAC आवश्यक असणाऱ्या बाबींसंदर्भात योग्य ते मार्गदर्शन मेंटॉर म्हणून टीसी महाविद्यालय करणार आहे. प्रामुख्याने प्राध्यापक व कर्मचारी यांना द्यावयाचे योग्य प्रशिक्षण, NAAC करिता आवश्यक ती कागदपत्रे तयार करणे व सादरीकरण करणे, विविध सामाजिक शैक्षणिक उपक्रम, संशोधन इ. बाबींमध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने प्रोत्साहन देणे इ. युजीसीची ध्येयधोरणे अंमलात आणणेकामी महत्वाची भूमिका बजावणार आहे. याप्रसंगी तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर व डॉ. अविनाश जगताप व महाविद्यालयांचे प्राचार्य व आय.क्यू.ए.सी. को-ऑर्डीनेटर उपस्थित होते.

[5502]-10

Library, Baramati

२ पुढारी MY पुणे जिल्हा पुणे, शुक्रवार, ११ ऑक्टोबर २०१९

# बारामतीमधील 'अनेकान्त'च्या 'एआयएमएस'मध्ये राष्ट्रीय परिषद

**बारामती : प्रतिनिधी**

बारामती येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या अनेकान्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज येथे नुकतीच राष्ट्रीय परिषद पार पडली. या परिषदेत देश-विदेशातील प्राध्यापक, संशोधक, उद्योगतज्ञ व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सहकार्याने ही परिषद घेण्यात आली.

'हायर एज्युकेशन मेटामॉर्फोसिस क्युस्ट फॉर क्वालिटी' हा या परिषदेचा विषय होता. श्रीनिवास विद्यापीठ, मंगळुरूचे डॉ. पी. एस. अयथाळ, बेंगळुरूच्या इन्स्टिट्यूट ऑफ ख्रिस्ट विद्यापीठाच्या प्रा. प्रभा किरण, अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अरहतदास शहा, सचिव जवाहर शाह-वाघोलीकर, एआयएमएसचे सचिव मिलिंद शाह-वाघोलीकर, सोनिक शहा, टी.सी. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर, विद्याधर महामुनी, संस्थेचे संचालक डॉ. एम. ए. लाहोरी, समन्वयक डॉ. तानाजी चव्हाण आदी यावेळी उपस्थित होते. या परिषदेत ६६ शोधलेख मांडण्यात आले. डॉ. अयथाळ यांनी जागतिक दर्जाची संस्था निर्माण करण्यासाठी आवश्यक बाबींवर मार्गदर्शन केले. विद्यार्थी गटात साकीब इब्राहिम खान, डॉ. मुरारी शर्मा, उपेंद्र शुक्ला यांना उल्लेखनीय शोधलेखाबद्दल गौरवण्यात आले. आंतरविद्यालयीन स्पर्धेत अमतुल्ला बारामतीवाला याने प्रथम, राहुल सोळंकी याने द्वितीय आणि हरिश्चंद्र चौगुले याने तृतीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. समारोप डॉ. राजकुमार छाजेड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी धनंजय जामदार यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. डॉ. यू. एस. कोळ्ळीमठ यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. दत्तात्रय मोरे यांनी आभार मानले.

सकाळ · दि - १३/१०/२०१९ · पा.नं - ४

# एम्समधील राष्ट्रीय परिषदेत विविध विषयांवर चर्चा

**बारामती शहर, ता. १२ :** येथील अनेकांत एज्युकेशन सोसायटीच्या अनेकांत इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजमध्ये (एम्स) झालेल्या राष्ट्रीय परिषदेत विविध विषयांवर सांगोपांग चर्चा करण्यात आली.

हायर एज्युकेशन मेटामॉर्फिसिस क्युस्ट फॉर क्वालिटी हा यंदाच्या परिषदेचा मुख्य विषय होता. या परिषदेत ६६ शोधलेखांचे सादरीकरण करण्यात आले. मंगळूरच्या श्रीनिवास विद्यापीठाचे डॉ. पी. एस. अयथाळ यांनी जागतिक दर्जाच्या संस्था निर्माण होण्यासाठी नेमके काय करायला हवे, याबाबत मार्गदर्शन केले. या प्रसंगी बंगळूरस्थित इन्स्टिट्यूट ऑफ ख्रिस्ट विद्यापीठाच्या प्रभा किरण, अनेकांतचे अध्यक्ष अरहतदास सराफ, सचिव जवाहर वाघोलीकर, एम्सचे सचिव मिलिंद वाघोलीकर, सोनिक पंदारकर, तुळजाराम चतुरचंदचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर, विद्याधर महामुनी, एम्सचे संचालक डॉ. एम. ए. लाहोरी, डॉ. तानाजी चव्हाण यांच्या उपस्थितीत ही परिषद झाली. साकीब इब्राहिम खान, डॉ. मुरारी शर्मा, उपेंद्र शुक्ला यांना उल्लेखनीय शोधलेखाबद्दल गौरविण्यात आले. आंतरविद्यालयीन स्पर्धेत अमतुल्ला बारामतीवाला, राहुल सोळंकी व हरिश्चंद्र चौगुले यांनी प्रथम तीन क्रमांकाची बक्षिसे मिळविली. डॉ. राजकुमार छाजेड यांच्या उपस्थितीत समारोप झाला. या प्रसंगी उद्योजक धनंजय जामदार हेही उपस्थित होते. डॉ. यू. एस. कोळ्ळीमठ यांनी सूत्रसंचालन केले. स १३/१०/ ४

ABS 14.10.

[5502]-EXT-8

Tuljaram Chaturchand College Library * Baramati *

· मा· प्राचार्य साहेब ·

सोमवार, ७ ऑक्टोबर २०१९

MY पुणे जिल्हा दक्षिण पुढारी ५



परामर्श प्रकल्पांतर्गत सहा महाविद्यालयांशी करार केल्यानंतर त्यांच्यासमवेत टीसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर.

# टीसी महाविद्यालयाचा ६ महाविद्यालयांशी करार

बारामती : प्रतिनिधी

विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) परामर्श योजनेसाठी तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाची (टीसी) 'मेंटॉर कॉलेज' म्हणून निवड केली. या अंतर्गत महाविद्यालयाने सहा अन्य महाविद्यालयांशी करार केला.

जिल्ह्यातील वसंतराव फराटे पाटील आर्ट्स, कॉमर्स व सायन्स कॉलेज, भवानीनगर, सोमेश्वर सायन्स कॉलेज, शिवनगर, विद्या प्रसारक मंडळाचे कॉमर्स, सायन्स आणि कॉम्प्युटर एज्युकेशन, माळेगाव, जिजामाता महाविद्यालय, सराटी, रत्नप्रभादेवी पाटील महिला महाविद्यालय, बावडा या महाविद्यालयांशी हा शैक्षणिक करार करण्यात आला आहे.

या सर्व महाविद्यालयांना टीसी महाविद्यालय नॅक मूल्यांकनासाठी आवश्यक बाबींसंदर्भात मार्गदर्शन करणार आहे. प्रामुख्याने प्राध्यापक व कर्मचारी यांना द्यावयाचे योग्य प्रशिक्षण, नॅककरिता आवश्यक ती कागदपत्रे तयार करणे व सादरीकरण करणे, विविध उपक्रम, संशोधन इत्यादी बाबींमध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने प्रोत्साहन देणे यासाठी महत्वाची भूमिका बजावणार आहे. या प्रसंगी तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, डॉ. अविनाश जगताप, सहा महाविद्यालयांचे प्राचार्य व आयक्यूएसी समन्वयक उपस्थित होते.

MBS 7/10

Chaturchand College Library Baramati

मा. प्राचार्य साहेब.

सोमवार, १४ ऑक्टोबर २०१९ MY पुणे जिल्हा दक्षिण पुढारी ५

# टी. सी. महाविद्यालयात क्लाऊड मॅनेजमेंट कार्यशाळा

**बारामती : प्रतिनिधी**

बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयामध्ये सहादिवसीय क्लाऊड मॅनेजमेंट कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या संगणकशास्त्र विभागाने आयसीटी ॲकॅडमी व सेल्सफोर्स यांच्या सहकार्याने एमएससी संगणक शास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी सेल्सफोर्स एडीएक्स २०१ ही सहादिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांच्या हस्ते करण्यात आले. केवळ [illegible]याच्या संधीकडे न पाहता भविष्यात काय संधी निर्माण होतील, याचा दूरदृष्टीने विचार विद्यार्थ्यांनी केला पाहिजे. तुळजाराम महाविद्यालय हे अशा प्रकारची कार्यशाळा घेणारे राज्यातील पहिलेच महाविद्यालय आहे. सेल्सफोर्स अशा प्रकारच्या कार्यशाळा भारतामधील निवडक अशा केवळ ५० महाविद्यालयांमध्येच घेणार आहे. सेल्सफोर्स ही जगातील सर्वात मोठी क्लाऊड आधारित सीआरएम कंपनी आहे. या कंपनीमुळे २०२२ पर्यंत भारतामध्ये अंदाजे १० लाख रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होणार आहेत. या कार्यशाळेमध्ये प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना अनेक संधी आयटी कंपनीमध्ये सहज मिळू शकतात, अशी माहिती संगणकशास्त्र विभागातील प्रा. राहुल शहा यांनी दिली. आयसीटी ॲकॅडमीतर्फे प्रवीण जैन, वरिष्ठ व्यवस्थापक विरा भास्करन, क्रांती कुमार, प्रा. उपेंद्र चौधरी, प्रा. राहुल शहा आदी या वेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचान प्रा. लोंढे यांनी केले. प्रा. गविमठ यांनी आभार मानले.



तुळजाराम महाविद्यालयात आयोजित कार्यशाळेत सहभागी प्राध्यापक वर्ग.

MBS 14/10/19

Tuljaram Chaturchand College Library Baramati

बुधवार, २३ ऑक्टोबर २०१९ ३

# टीसी कॉलेजमध्ये चिंतन महर्षी डॉ. प्रणामसागरजी यांचे प्रबोधनपर व्याख्यान

● बारामती : वार्ताहर

संत आणि शिक्षक सर्वत्र पुजिला जातो. यावरूनच त्याचे महत्त्व लक्षात येते. आई-वडिलांपेक्षा शिक्षकांचे सांगणे विद्यार्थी अधिक ऐकत असतात. त्यामुळे शिक्षकाची जबाबदारीदेखील अधिक वाढते. शिक्षकाच्या अंगी शिष्टाचार, क्षमाभाव आणि कर्तव्यनिष्ठा असली पाहिजे. अनेकांत एज्युकेशन सोसायटी ही शिक्षणासोबतच संस्कार देणारी संस्था असल्याचे गौरवोद्गार प.पू. चिंतन महर्षी डॉ. मुनिश्री १०८ प्रणामसागरजी महाराज यांनी काढले.



बारामती शहरातील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात आयोजीत प्रबोधनपर व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी सोसायटीचे अध्यक्ष अरहतदास शहा सराफ, सचिव जवाहर शाह (वाघोलीकर), खजिनदार सुनील शहा लेंगरेकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर, रजिस्ट्रार अभिनंदन शहा, संस्थेचे सर्व पदाधिकारी व विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी आपल्या व्याख्यानात मुनिश्रींनी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना व्याख्यानातून प्रबोधनपर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांबाबत बोलताना ते म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपल्या ध्येयापासून ढळू नये. तसेच आपल्या विषयांशिवाय इतर विषयांची आवड आणि वाचन असणे गरजेचे आहे. त्यांनी शिक्षक आणि शिक्षणाचे मानवी आयुष्यातील महत्त्व समजावून सांगितले.

स्वागत आणि प्रास्ताविक महाविद्यालयाचे, प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी केले. महाराजजींच्या मातोश्री निर्मलाजी जैन यांचा सत्कार कुसुमकाकी राजकुमार शाह (वाघोलीकर), लतिकाकाकी जवाहर शाह, मंगलकाकी सुनिल शहा लेंगरेकर यांनी केला.


यावेळी आभार संस्थेचे सदस्य मिलिंद शहा वाघोलीकर यांनी मानले.

तत्पूर्वी डॉ. प्रणामसागरजी यांनी महाविद्यालयातील प्रशासन भवन, संगणक विभाग, व्होकेशनल सेंटर, ग्रंथालय तसेच एम.बी.ए. महाविद्यालय आणि अनेकांत इंग्लिश मिडीअम स्कूलला भेट देऊन पाहणी केली. या कार्यक्रमात प्रेक्षा शहा यांनी मंगलाचरण केले.

Tuljaram Chaturchand College Library Baramati

साप्ताहिक रुलिंग दिनांक ५/१२/२०१९ पान नं. २

# अनेकान्तमध्ये वॉटर बेल उपक्रम सुरू



बारामती - येथील अनेकान्त इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये 'वॉटर बेल' हा नवीन उपक्रम सुरु करण्यात आला आहे. केरळ राज्याच्या धर्तीवर शालेय वेळांत मुलांना पाणी पिण्यासाठी स्वतंत्र वेळ देण्यात आला आहे. विशेष म्हणजे याची आठवण करून देण्यासाठी शाळेची घंटा वाजवली जाणार आहे. पुरेशा प्रमाणात पाणी पिल्याने विद्यार्थ्यांचे आरोग्य निरोगी राहते.

शाळेत येणाऱ्या मुलांचे आरोग्य सुदृढ राहिल्यास त्यांचे अभ्यासाकडे लक्ष केंद्रित होते. तसेच मुलांना भरपूर पाणी पिण्याची सवय लागते. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी झाल्यास विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर त्याचे घातक परिणाम होऊ शकतात. उत्तम आरोग्य टिकवण्यासाठी पाणी पिणे महत्त्वाचे असल्याचे प्राचार्या राखी माथुर यांनी स्पष्ट केले.

Chaturchand College Library Baramati

साप्ताहिक रणशिंग दि ५/१२/२०१९ पान नं. ६.

# ई-वेस्ट मॅनेजमेंटमध्ये टी.सी. कॉलेजचा पुढाकार

बारामती- आपल्या रोजच्या वापरण्यात येणारे चार्जर, हेडफोन, रेडिओ, मोबाईल, की-बोर्ड माऊस, कॅल्युलेटर, अशा एक ना अनेक गोष्टी खराब झाल्यावर करोयचं काय असा प्रश्न सर्वांसमोर उभा राहतोय. ही समस्या आपल्या एकट्याचीच नाही तर सगळ्या जगाची आहे. त्यावर एकच उपाय म्हणजे ई-वेस्ट मॅनेजमेंट. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाने ई-वेस्ट मॅनेजमेंटसाठी पुढाकार घेतलाय. महाविद्यालयातील बी.व्होक रिटेल मॅनेजमेंट आणि टाटा क्रोमा यांच्या संयुक्त विद्यमानाने दिनांक ०२ आणि ०३ डिसेंबर रोजी इलेक्ट्रॉनिकस वेस्ट कलेक्शन आयोजित केलाय. या उपक्रमाचे उदघाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ चंद्रशेखर मुरूमकर यांनी केले. यावेळी श्री. समीर दिवरे, मॅनेजर,क्रोमा स्टोअर्स उपस्थित होते. रिसायकलींग केल्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास थांबवण्यास मोठा हातभार लागत आहे, त्यामुळे बारामतीकरांनी या उपक्रमामध्ये सहभाग घ्यावा असे आवाहन महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. मुरुमकर यांनी केले.

इलेक्ट्रॉनिक वेस्ट कलेक्शन यामध्ये खराब झालेले चार्जर, हेडफोन, रेडिओ, मोबाईल, स्क्रिन, कीबोर्ड माउस अश्या अनेक प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक वस्तू जमा करून टाटा क्रोमा स्टोअर्सला देण्यात येणार आहेत. या सर्व वस्तुंचे रिसायकलींग करून पुर्नवापर करण्यात येणार आहे.

या कार्यक्रम उदघाटन प्रसंगी प्राचार्य डॉ चंद्रशेखर मुरुमकर यांनी हा उपक्रम राबवल्याबद्दल रिटेल मॅनेजमेंट विभागाच्या प्राध्यापकांचे आणि विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या वेळी महाविद्यालयाचे उप-प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, डॉ. अजित तेलवे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सर्व नियोजन रिटेल मॅनेजमेंट विभागाचे प्रमुख प्रा. महेश फुले, प्रा. सुधीर तावरे आणि प्रा. अमृता बापट आणि विभागाच्या विद्यार्थ्यांनी केले.

साप्ताहिक रणशिंग दिनांक ५/१२/२०१९ पान नं. २

# तुळजाराम च. महाविद्यालयात दिव्यांगांकरिता चर्चासत्राचे संपन्न



बारामती - मंगळवार दि.३ डिसेंबर रोजी अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती व विद्यार्थी विकास मंडळ यांचे संयुक्त विद्यमाने जागतिक दिव्यांग दिनानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी सत्कार सोहळा व चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या चर्चासत्राचे प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना मा.प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर यांनी आपल्याकडे कमतरता नाही असे वर्तन आपले असावे त्यामुळे आपल्याकडे असलेल्या क्षमतांना कौशल्याची जोड दिल्यास जीवन सामान्य नागरिकाप्रमाणे समाधानाने ... शकता होते असे प्रतिपादन केले.

तसेच या कार्यक्रमामध्ये डॉ.विजयकुमार शिंदे मानसशास्त्र विभागप्रमुख यांनी ज्या दिव्यांगांनी ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये बाजी मारली त्यांची उदाहरणे देऊन दैनंदिन जीवनामध्ये आलेल्या नैराश्यांवर कशा पद्धतीने मात करता येईल ज्यामुळे अनेक स्पर्धांच्या माध्यमातून उपलब्ध संधीचा फायदा दिव्यांगांना होऊ शकतो याबद्दल त्यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकानंतर सर्व दिव्यांगांचा सत्कार मा.प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच चर्चासत्राच्या दरम्यान विद्यार्थी कुचेकर शिक्षकेतर कर्मचारी सौ. सुनिता मेळकुंदे यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी दिव्यांग असण्याचा न्यूनगंड झुगारून कशा पद्धतीने यश संपादन केले याबद्दलचा जीवनपट उलगडला इतरांनी सुद्धा त्याचे अनुकरण करण्याबद्दल त्यांनी आवाहन केले. महाविद्यालयात दिव्यांग विद्यार्थी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकरिता सर्व भौतिक सोईसुविधा उपलब्ध असल्याबद्दल समाधान त्यांनी व्यक्त केले. या उपक्रमास एकूण १६ दिव्यांगांनी उपस्थिती दर्शविली